गुरुवार, १४ सप्टेंबर २०२३

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ४५

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक





●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●THURSDAY 14 SEPT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-45 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5


### महत्त्वाची बातमी

## धीरेंद्र कृष्णशास्त्रींचे दलित समाजाबद्दल वादग्रस्त वक्तव्य

आधुनिक केसरी न्यूज

**सीकर :** प्रसिद्ध कथावाचक आणि बागेश्वर धामचे धीरेंद्रकृष्ण शास्त्री यांनी दलित समाजाविषयी वादग्रस्त वक्तव्य केल्याचा आरोप आहे. धीरेंद्रशास्त्री यांच्या वक्तव्यामुळे बसोर या दलित समुदायाचा अपमान झाल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. यानंतर आता बसोर समाजाकडून अनुसूचित जाती आणि जनजाती अधिनियमांतर्गत पोलिसात तक्रार करण्यात आली आहे. यानंतर पोलिसांनी तक्रारीच्या आधारे तपास सुरु केला आहे. बागेश्वर धामचे पंडित धीरेंद्रशास्त्री या त्यांच्या दिव्य दरबारात युवकासह बोलत होते. बाबा बागेश्वर यांनी काढलेल्या एका चिठ्ठीवर या युवकाने आक्षेप घेतला. त्यावर बाबा बागेश्वर भडकले. त्यानंतर त्यांनी युवकाला आव्हान दिलं. त्यावेळी युवक म्हणाला की मी ब्राह्मण आहे. त्यावेळी बाबा म्हणाले मग मी काय बसोर आहे का? यानंतर हा युवक आणि बाबा यांच्यात बराच वाद झाला. धीरेंद्रशास्त्रींनी २ सप्टेंबरला हे वक्तव्य केले होते. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. २ सप्टेंबरला धीरेंद्रशास्त्री हे सीकरमध्ये होते. त्यावेळी त्यांनी हे घटना घडली आहे. हा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर छतरपूरच्या दलित समाजाने पोलीस ठाण्यात धीरेंद्रशास्त्रींच्या विरोधात तक्रार नोंदवली आहे. राजस्थानातल्या सीकरमधल्या मंचावरून बागेश्वर बाबांनी आमच्या समाजाचा अपमान केला असा आरोप आता बसोर समाजाने केला आहे. धीरेंद्रशास्त्रींविरोधात गुन्हा दाखल झाला नाही तर देशभरात आंदोलन करू आणि बसोर समाज सोडून बौद्ध धर्म स्वीकारू असेही म्हटले आहे.

# व्हिडीओ व्हायरल होताच दौरा रद्द

## संभ्रम निर्माण होईल असा मेसेज पसरवला जातोय : मुख्यमंत्री शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**जालना : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेल्या पंधरा दिवसांपासून मनोज जरांगे उपोषण करत आहे. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बुधवारी संध्याकाळी पाच वाजता मनोज जरांगे यांची भेट घेणार होते. याबाबत मुख्यमंत्री शिंदे यांचा दौरा देखील आला होता. मात्र पत्रकार परिषदेदरम्यानचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत जरांगे यांच्यासोबत आमची अजून चर्चा सुरू असल्याचे म्हटले असून मुख्यंमत्री यांचा हा दौराच रद्द झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.**



एकनाथ शिंदे जरांगे यांच्या भेटीला बुधवारी संध्याकाळी जाणार होते. मात्र त्यापूर्वीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अजित पवार यांच्या पत्रकार परिषदेचा व्हिडिओ व्हायरल झाला. ज्यात मुख्यमंत्री शिंदे म्हणाले होते की, आपल्याला काय? बोलायचं अन् निघून जायचं, बोलून मोकळं व्हायचं....त्यावर अजित पवार म्हणाले हो....तर माईक चालू आहे असे देवेंद्र फडणवीस म्हणाले होते. आता याच व्हिडिओवरून एकनाथ शिंदे यांना ट्रोल केले जात आहे. तसेच विरोधकांकडून देखील टीका होत आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री शिंदे यांचा आंतरवाली येथील दौरा रद्द करण्यात आल्याची चर्चा आहे. मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे यांनी आपण मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्तेच उपोषण सोडणार असल्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे जरांगे यांची भेट घेणार असल्याची चर्चा होती. विशेष म्हणजे काही तासांपूर्वी मुख्यमंत्री शिंदे यांचा आजचा आंतरवाली दौरा देखील आला होता. ज्यात 4. 15 वाजता मुख्यमंत्री शासकीय विमानाने छत्रपती संभाजीनगर विमानतळावर दाखल होणार होते. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून हेलिकॉप्टरने जालना येथील अंकुशराव टोपे साखर कारखान्यात त्यांचे आगमन होणार होते. मात्र, आता हा दौरा रद्द करण्यात आला आहे. मुख्यंमत्री यांचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने हा दौरा रद्द करण्यात आल्याची देखील चर्चा आहे.

पत्रकार परिषदेमध्ये जाताना फक्त मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मुद्द्याचे बोलायचे, इतर काही राजकीय वक्तव्य करायचे नाही, अशी आमची चर्चा झाली होती, पण सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यामध्ये तोडफोड करुन लोकांमध्ये संभ्रम निर्माण होईल, असा मेसेज पसरवला जात आहे, ते चुकीचे आहे, असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले . अपप्रचाराला आणि दिशाभूल करणाऱ्या गोष्टींना मराठा समाजाने बळी पडू नये असेही मुख्यंत्री म्हणाले . मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर पत्रकार परिषद घेण्यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि फडणवीस यांच्या संवादाचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे . त्यानंतर या सोशल मीडियातून राज्य सरकारवर मोठी टीका होत आहे . मराठा समाजाला, मराठा क्रांती मोर्चा आणि समन्वयकांनाही आवाहनवजा विनंती आहे, त्यादिवशी सह्याद्री अतिथीगृहात पहिल्यांदाच अशापद्धतीने सर्वपक्षीय बैठक घेण्यात आली . साधक बाधक चर्चा झाली . राज्यात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित झाली पाहिजे . उपमुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करताना आम्ही बोलत बोलत येत होतो, ज्या मुद्यावर चर्चा झाली, प्रॅक्टिकल मुद्यांवर चर्चा झाली यावरच बोलूया, राजकीय विषय नको, अशी आमची चर्चा सुरू होती . कुठलेही राजकीय भाष्य, प्रश्नोत्तरे आज नको अशी चर्चा आम्ही करत होतो . परंतु काही लोक सोशल मीडियावर काहीही अर्थ काढून, संभ्रमाचे वातावरण तयार होईल, मराठा समाजाला आरक्षण देताना या माध्यमातून विघ्नसंतोषी लोक हे करत आहेत . फडणवीस यांच्या काळात आरक्षण मिळाले होते . कायद्याने ते टिकले नाही . 3 हजार 700 नोकऱ्या आम्ही मराठा समाजाला दिल्या होत्या . मराठा आरक्षण देण्याचा भूमिका सरकारची स्पष्ट आहे, यासाठीच त्यादिवशी सर्वपक्षीय बैठक बोलवली होती, असेही शिंदे म्हणाले .

## संसद कर्मचाऱ्यांच्या गणवेशावर कमळ : काँग्रेस आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** संसदेचे विशेष अधिवेशन १८ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. ते का बोलवले जाते आहे? अशी टीका विरोधकांकडून करण्यात येते आहे. अशात संसदेच्या कर्मचाऱ्यांच्या ड्रेस कोडवरून नवा वाद सुरू झाला आहे. संसद कर्मचाऱ्यांना कमळ असलेले जॅकेट्स गणवेश म्हणून देण्यात आले आहेत. हे अत्यंत खालच्या पातळीचे राजकारण आहे अशी टीका काँग्रेसने केली आहे. एवढेच नाही तर जो गणवेश दिला आहे त्यातल्या जॅकेटवर कमळाचं फुल का? वाघ किंवा मोर का नाही? असाही प्रश्न काँग्रेने विचारला आहे. लोकसभेच्या सचिवालयाने दिलेल्या पत्रानुसार मार्शल, सुरक्षा कर्मचारी, अधिकारी, चेंबर अटेंडेंट आणि चालक यांचे गणवेश बदलण्यात आले आहेत. नव्या संसद भवनात विशेष अधिवेशनाचे कामकाज सुरु होण्याआधी हे गणवेश त्यांना परिधान करायचे आहेत. बंद गळ्याच्या सूटच्या जागी अधिकाऱ्यांना गुलाबी रंगाचे जॅकेट घालावे लागणार आहे. कर्मचाऱ्यांना त्यांना गणवेशावर खाकी पँट आणि शर्ट असा ड्रेस देण्यात आला आहे त्यावर फुलांचे डिझाईन असणार आहे. लोकसभा आणि राज्यसभेच्या



मार्शल्सना मणिपुरी पगडी दिली गेली आहे. तर संसदेच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना लष्करी गणवेशाप्रमाणे गणवेश देण्यात आले आहेत. महिला कर्मचाऱ्यांसाठी साडी, ब्लाऊज आणि जॅकेट ड्रेस कोड ठरवण्यात आला आहे. जॅकेटवर कमळाचे डिझाईन आहे. गणवेश बदलले गेल्यानंतर त्यावर जे कमळाचे फूल आहे त्यावरून काँग्रेसने भाजपावर टीका केली आहे. काँग्रेस खासदार मणिकम टागोर यांनी म्हटले आहे भाजपा संसदेला स्वतःचे व्यासपीठ म्हणून देशासमोर आणू इच्छिते आहे असा आरोप केला आहे. तसंच टागोर यांनी असेही म्हटले आहे की, गणवेशावर



आपला राष्ट्रीय पशू वाघ किंवा राष्ट्रीय पक्षी मोर यांचे चित्र का नाही? त्यावर कमळाचे फूल का? मी लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना विचारु इच्छितो की आपल्या सभागृहाची पातळी इतकी का घसरली आहे? टागोर म्हणाले संसदेच्या कर्मचाऱ्यांच्या गणवेशावर भाजपाचे निवडणूक चिन्ह असलेले कमळाचे फूल आहे. जी २० परिषदेचा लोगोही कमळाचाच होता. आता हे सगळे म्हणत आहेत की कमळ हे राष्ट्रीय फूल आहे. संसद ही सगळ्या पक्षांपेक्षा मोठी आहे, मात्र भाजपाने गणवेशांवर कमळ आणून घाणेरडे राजकारण केले आहे.

## गरिबांना ७५ लाख नवीन मोफत एलपीजी कनेक्शन मंजूर


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** गेल्या काही वर्षांपूर्वीच केंद्रातील मोदी सरकारने उज्ज्वला २.० योजना सुरू केली असून, तिला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या योजनेंतर्गत आता आणखी ७५ लाख मोफत एलपीजी कनेक्शन दिले जाणार आहेत. उज्ज्वला योजनेंतर्गत पुढील ३ वर्षांत महिलांना ही एलपीजी जोडणी मिळणार आहे. कॅबिनेट बैठकीची माहिती देताना केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर म्हणाले की, आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत उज्ज्वला योजनेंतर्गत नवीन कनेक्शन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उज्ज्वला योजनेमुळे पर्यावरणाचे रक्षण होण्यास मदत झाली असून, महिलांचे आरोग्यही सुधारले आहे. अनुराग ठाकूर म्हणाले की, जी २० शिखर परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल केंद्रीय मंत्रिमंडळाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन केले आहे. देशवासीयांच्या वतीने संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन केले आहे. या शिखर परिषदेत जगाच्या हिताचे निर्णय घेण्यात आले आणि आज भारत जागतिक स्तरावर अजेंडा ठरवत आहे, असेही अनुराग ठाकूर म्हणालेत. रक्षाबंधन आणि ओणम सणानिमित्त एलपीजीच्या किमती कमी करण्यात आल्याचेही अनुराग ठाकूर यांनी सांगितले. या मंत्रिमंडळ बैठकीत ई-कोर्सला मान्यता देण्यात आली आहे. यामुळे काम पेपरलेस होईल आणि ई-सेवा केंद्राची स्थापना होईल. हार्डवेअर आणि नेटवर्क व्यवस्था प्रदान केली जाणार आहे. इलेक्ट्रॉनिक फायलिंगसाठी ई-फायलिंगची व्यवस्था केली जाणार आहे. तसेच ४४०० नवीन ई-सेवा केंद्रे उघडण्यात येणार आहेत. जैवइंधन तयार करणे हे एक मोठे यश असून, वाहतूक चलनाची आभासी व्यवस्था करण्यात आली आहे. ई-कोर्ट मिशन मोड प्रकल्पाचा टप्पा ३ आज मंजूर झाला आहे.










विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


' वहिनी, आपल्या मीटरपेक्षा थोडे जास्त म्हणजे गज. साधारणपणे १५ गज कापड म्हणजे आपला आताच चौदा मीटर कपडा. आणि तुम्हाला सांगितलं तर आश्चर्य वाटेल की या १५ गज कापडाचं वजन १०० ग्रॅम पेक्षाही कमी होतं. १३ गज कपडा तर एखाद्या अंगठीतून सुद्धा बाहेर पडेल इतका तलम असायचा. ' भगवानराव म्हणाले. खरोखरच त्या काळातील कापड बनवणारे कारागीर किती कुशल असतील नाही ! ' राजेश म्हणाला. ' होय, अरे मार्टिन नावाचा स्कॉटिश इतिहासकार तर म्हणतो की ज्या काळात इतर देशातील लोक प्राथमिक अवस्थेत जीवन जगत होते, त्या काळात भारतात अशा प्रकारची उत्तम वस्त्रनिर्मिती होत होती. भारतानेच जगाला कपडा बनवायला शिकवले. रोमन साम्राज्यातील राजे, राण्या भारतातून कापड मागवत असत आणि तीच वस्त्रे परिधान करीत. फ्रेंच इतिहासकार टॅव्हर्नी याने तर भारतीय कपड्यांची तोंड भरून तारीफ केली आहे. इंग्लंडमध्ये सुद्धा कपडा बनवण्याची कला लोकांना इ स १७८० नंतर अवगत झाली. '

' थॉमस मुनरो हा इंग्रज अधिकारी तत्कालीन मद्रासमध्ये दीर्घकाळ गव्हर्नर पदावर होता. त्याला इंग्लंडला परत जाताना तेथील राजाने एक शाल भेट दिली. त्याने ती शाल अनेक वर्षे वापरली. पण ती थोडीही खराब झाली नाही, तिचा रंग विटला नाही. त्याने १८१३ मध्ये इंग्लंडच्या संसदेत भाषण केले, तेव्हा या शालीचा उल्लेख करून भारतातील वस्त्रनिर्मितीबद्दल गौरवोदगार काढले. ' परंतु इतकी सुंदर वस्त्रनिर्मिती करणारे कारागीर काळाच्या ओघात नष्ट झाले. त्यासाठी आवश्यक असणारा धागा किंवा त्या प्रतीचा कापूस मिळेनासा झाला. पुढे पुढे तर इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनीने यावर ताबा मिळवला. त्यांनी स्थानिक व्यापाऱ्यांना बाजूला करून स्वतःच या कापडाची खरेदी सुरु केली. हे काम करणाऱ्या कारागिरांना अगदी कमी मोबदला ते देऊ लागले. कारागिरांची उपासमार होऊ लागली. नंतर इंग्लंडमधून मशीनवर तयार होणारं कापड भारतात येऊ लागलं. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर भारतातील या भव्यदिव्य अशा पारंपरिक वस्त्रनिर्मितीच्या उद्योगाला उतरती कळा लागली. '

आता बराच वेळ झाला होता. छोटा चैतन्यही कंटाळला होता. भगवानराव आणि भार्गवी वहिनींनी सगळ्यांचा निरोप घेतला. पिंकी आणि राजेशला बाय केलं. ( क्रमशः )



## स्वयंपूर्ण ग्रामीण भारत



## आनंदी पहाट

## शरीर हे भोग नव्हे; तर योगसाधनेचे माध्यम

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपलं शरीर आणि अंतर्गत इंद्रिये यांच्यापेक्षाही आपलं मन अधिक महत्त्वाचं असतं. ज्ञानेंद्रिये माहिती गोळा करतात. ती माहिती मेंदूमध्ये साठवली जात असते. त्या माहितीचा अर्थ लावण्याचं काम, तिचं मूल्यमापन करण्याचं काम मन करत असतं. म्हणूनच आपल्याला प्रत्येक गोष्टीची जाणीव होत असते. आपल्याला ह्या जगात कोणतीही गोष्ट फुकट मिळत नाही. आपले शरीर मात्र याला अपवाद आहे. कारण ते आपल्याला फुकट मिळालेलं आहे. कदाचित त्यामुळेच शरीराची काळजी न घेता आपण फुकटचं आजारपण ओढवून घेत असतो. आयुष्यात अनेक गोष्टी पुनःपुन्हा मिळू शकतात, परंतू आपलं शरीर मात्र पुन्हा मिळत नाही. म्हणूनच त्या शरीराची काळजी घेणं जरुरीचं असतं. योग ही एक जीवनपद्धती असून, ती पुरातन काळापासून भारतात प्रचलित आहे. योग हा मुळात अध्यात्मिक प्रचितीकरिता केला जातो. योगामुळे मनःशांती तर प्राप्त होतेच, त्याचप्रमाणे शारीरिक, मानसिक स्वास्थ्यसुद्धा लाभते. योगासन, प्राणायाम, ध्यान, सूर्यनमस्कार, श्वसनाचे प्रकार ह्या सर्व प्रक्रिया शरीराच्या माध्यमातूनच कराव्या लागतात. ह्या सर्वांच्या सरावानं मन, शरीर व श्वास ह्या गोष्टी एका लयीत येण्यास मदत होत राहते. शरीर सुस्थितीत असेल तरच योग साधना चांगली होऊ शकते. शरीर हे योग साधनेचं माध्यम असल्याची जाणीव आपण करून घेतली पाहिजे. आपल्या प्रत्येकाला प्रकृतीची काळजी घेणं जरुरीचं असतं. त्यासाठी आवश्यक ती पथ्य पाळणे देखील आवश्यक असतं. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या व्यग्र आणि व्यस्त दिनक्रमांत आपण दीनदुबळ्या अवस्थेलाच निमंत्रित करत असतो, हे नेहमीच विसरतो, अथवा त्याची जाणीव आपल्याला त्यावेळी होत नाही.



आधुनिक केसरी

## नसता अटळ | भोग भाळी ||

देवाचा आठव | गरिबीत येतो ||
विसर पडतो | श्रीमंतीत ||१||
सत्कर्माचे रूप | आचरावे नित्य ||
आत्मानंद सत्य | त्यात वसे ||२||
लटक्या वाणीचा | असावा विटाळ ||
नसता अटळ | भोग भाळी ||३||
मौनाच्या वारीत | देवही नाचले ||
ऐरावत झुले | अंगणात ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

दूरीकुरुश्व मे तापान् वृषभध्वजवल्लभे | धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम् || ८८ || वृषभ ज्यांचे वाहन आहे, अशा भगवान श्री महादेवाच्या प्रिये, माझे ताप दूर कर. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

अमत व मत सब मत परे, ज्ञान ज्ञान का होय । जेहि अनुभव अनुभव मिले, विद्या परा है सोय ।।२५।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल प्रथम अध्याय) ०४/०१/२५ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : ब्रह्मविद्या हा संप्रदाय नाही, ती सर्व मत-मतांतररहित सर्वांहून भिन्न आहे. ज्या ज्ञानाने सर्व ज्ञान प्राप्त होतात तसेच ज्या अनुभवाने समस्त अनुभव आपोआप प्रत्यक्ष होत जातात, ती पराविद्या आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ४३वे

लिहिती राहो रामनाम सदा ही लेखणी
कवी-अरुणदास करी नित्य विनवणी ।।
श्री महाराज अलिबागहून पुढे निघाले
क्रमणा करीत ते उत्तरेकडे चालले
नर्मदाकाठीच्या भागात मुक्काम त्यांचा झाला
शिष्य सच्चीदानंदाला रामनाम बोध केला ।।
उज्जैन या शहरात त्यांचे आगमन झाले
ते आले", वृत्त हे पंचक्रोशीत ते पसरले
ज्या ठिकाणी महाराज मुक्कामास उतरले
भजन-कीर्तन ,श्रवण, अन्नदान सुरू झाले ।।
भक्त रावसाहेबास श्री महाराज म्हणाले
रामरायानेच तुमच्या पुत्रास वाचविले
दासनवमीला सज्जनगडास तुम्ही जावे
पुढे हे रावसाहेब थोर योग्यतेस पोंचले ।।
उज्जैन नंतर महाराज इंदुरास आले
परिचितांना श्रीमहाराजांनी उपदेशिले
इंदूर शहरी वास्तव्य बहु दिवस झाले
नाव श्रीमहाराजांचे चोहीकडे पोहोंचले ।।
भक्त प्रांतोप्रांतीचे महाराजांच्या दर्शना येती
जातांना आपल्या सोबत रामनामास नेती
येता निरोप महाराज गोंदवल्यास निघती
भैयासाहेब, जिजाबाई सोबत ते असती ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## भगवंताजवळ काय मागावे

आधुनिक केसरी

परमात्मा कसा असतो म्हणून विचारले तर काय सांगता येईल ? तो तर नाम, रूप आणि गुण यांच्या अतीत आहे; म्हणून, आपल्या भावनेने जसा पाहावा तसा तो आहे असे सांगता येईल. म्हणजेच, सर्व काही आपल्या भावनेवर आहे. आपण त्याच्याजवळ काहीही मागितले तरी तो द्यायला तयार असतो. आपण विषय मागितले तर तो देत नाही असे नाही, पण त्याबरोबरच त्याचे फळ म्हणून सुखदुःखेही आपल्याला भोगावी लागतात. म्हणून, काही मागायचे झाले तर ते विचार करून मागावे. एक गृहस्थ दमून एका झाडाखाली बसला. ते झाड कल्पवृक्षाचे होते. तो सहज म्हणाला, 'इथे आता मला पाणी मिळाले तर फार बरे होईल.' असे म्हणताच त्याला पाणी मिळाले. पुढे, 'आता काही खायला मिळाले तर बरे.' असे म्हणताच त्याला खायला मिळाले. त्यावर, त्याला विश्रांती घ्यावीशी वाटली, आणि तसे म्हणताच त्याची निजण्याची सोय झाली. पुढे त्याला वाटले की आता इतके सर्व मिळाले, तेव्हां इथे माझी बायकोमुले असती तर मजा आली असती; असे म्हणताच ती तिथे आली. एवढे झाल्यावर त्याला वाटले, ' आपण जी इच्छा केली ते सर्व मिळाले. तर आता इथे मरण आले तर--' असे म्हणताच तो मरण पावला ! म्हणून काय, की विषय मागत गेले तर त्यापासून विषयच वाढत जातात. तेव्हां, ज्यापासून आपले कल्याण होईल असे मागावे. एका भिकाऱ्याला राजा म्हणाला की, 'तुला काय मागायचे असेल ते माग.' त्याने आपल्याला पांघरायला घोंगडी मागितली. मागितले असते तर अर्धे राज्यही द्यायला तो राजा तयार होता, त्याच्यापाशी त्याने यःकश्चित् घोंगडी मागितली. समर्थ द्यायला भेटल्यावर त्याच्याजवळ काय मागायचे हे नीट विचार करून मागावे. म्हणूनच, भगवंतापाशी त्याच्या भक्तिची याचना करावी; ही मागितल्याने आपल्याला समाधान मिळते, आणि दुसरे काही मागण्याची इच्छा होत नाही. भगवंताचे अवतार कसे झाले आहेत ? तर भक्तांकरिताच देवाला अवतार घ्यावे लागले आहेत. अवतार घेतल्यावर नुसते भक्तांचेच काम होते असे नाही, तर त्यामुळे इतरांनाही 'देव आहे' ही भावना निर्माण होते. आपण त्याला शरण जाऊन त्याचे होऊन रहावे, म्हणजे आपल्याला मग इतर कोणत्याही बाबतीत काळजी करण्याचे कारण उरत नाही. भगवंत हा अत्यंत दयाळू आहे. लोखंडाने परिसाला मारले तरी त्याचे सोनेच बनते. त्याप्रमाणे, भगवंताने भरताला भाऊ म्हणून तारला, बिभीषण शरण आला म्हणून त्याला तारला, आणि रावणाला शत्रू म्हणूनही तारला; पण त्याने सोडले कुणालाच नाही. असा भगवंत जोडायला नामाशिवाय दुसरा कोणताच उपाय नाही.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

सर्व साधारण पणे जीव हा कोणाच्या तरी साह्यानेच प्रगती करत असतो त्या मध्ये ग्रंथ हि मोठी भूमिका वठवतात ग्रंथातील विचार प्रगती कडेच नेतात. येथे सर्व श्रेष्ठ आपण त्या ग्रंथाला म्हणू कि ज्या ग्रंथाने माझ्या जीवनाला एक उत्कृष्ठ वळण दिले व त्यानेच मी आज येथे आहे .ग्रंथ हे गुरु आहेत मग ग्रंथ आयुष्याला वळण देऊ शकतो कि नाही ? जो ग्रंथ माझे आयुष्यच उत्कृष्ठ करतो तोच माझा उत्कृष्ठ ग्रंथ. मी सतत त्या ग्रंथाला मनाच्या मुलामय अशा बिछान्यावर सतत प्राणासमान जपतो त्याची काया वाचा मने पूजा करतो हा ग्रंथ मी नित्य वाचतो मनन करतो . त्यात लिहलेले सर्व हेच माझे जीवन मी त्या प्रमाणे वागण्यास बांधील आहे म्हणून मला आज हे सुंदर दिवस आले आहेत आणि माझ्या या ग्रंथावर असलेल्या श्रद्धेमुळेच माझी व माझ्या दिक्षा गुरु मधील अंतर कमी झाले व मला ह्या ग्रंथानेच गुरुंचा अनुग्रह होण्याचा मार्ग मोकळा केला व मला लायक केले .

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

अनंत ब्रम्हांडे उदरीं । हरि हा बाळक नंदा घरीं ॥१ ॥
नवल केव्हडें केव्हडें । न कळे कान्होबाचें कोडें ॥ध्रु. ॥
पृथ्वी जेणें तृप्त केली । त्यासि यशोदा भोजन घाली ॥२ ॥
विश्वव्यापक कमळापती । त्यासि गौळणी कडिये घेती ॥३ ॥
तुका म्हणे नटधारी । भोग भोगून ब्रम्हचारी ॥४ ॥
कृष्ण गोकुळीं जन्मला । दुष्टां चळकांप सुटला ॥१ ॥
होतां कृष्णाचा अवतार । आनंद करिती घरोघर ॥ध्रु. ॥
प्रेम नाम वाचें गाती । सदा आनंदें नाचती ॥२ ॥
तुका म्हणे हरती दोष । आनंदानें करिती घोष ॥३ ॥
मेळउनि सकळ गोपाळ । कांहीं करिती विचार ॥१ ॥
चला जाऊं चोरूं लोणी । आजि घेऊं चंद्रधणी ।
वेळ लावियेला अझुणी । एकाकरितां गडे हो ॥ध्रु. ॥

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे



बैलपोळ्याचा सण आला पण माझं काय...?

पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, १४ सप्टेंबर २०२३



स्त्रियांच्या भावविश्वाचे अनेक पदर उलगडणाऱ्या कविता

पान ७

# करपल्या शेंगा देवा, नुसतं हिरवं शिवार.. आता न्हाई मनी धीर उरला, खेळ मांडला !

## करडा येथील शेतकरी अरविंद देशमुख यांचा टाहो

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** यावर्षीच्या खरीप हंगामाची सुरुवातच मोठ्या गुंतागुंतीची झाली. सुरुवातीलाच पाऊस दडी धरून बसल्यामुळे खरिपाची पेरणी सर्वत्र उशिरा झाली. उशिरा झालेल्या पेरणीत सोयाबीन हे एकमेव पीक आहे, जे थोडाफार दिलासा देऊ शकते. हा शेतकऱ्यांचा आजवरचा अनुभव आहे. परिणामी, यावर्षीच्या सोयाबीन पेऱ्यात इतर पिकापेक्षा प्रचंड वाढ झाली. आणि मध्यंतरी निसर्गाने बऱ्यापैकी साथ दिली. पिकांना बहर येऊन सर्वत्र शेतशिवार हिरवागार झाला होता. त्यामुळे " बळीराजा " सुद्धा सुखावला होता. पण शेतकऱ्यांचा हा आनंद आऊटघटकेचा ठरला. पिके बहारात असतानांच पावसाने २० ते २५ दिवसांची ओढ दिली. मोठ्या प्रमाणात पाण्याची ताढण पडल्यामुळे, उभे पीक करपून माना टाकू लागले. डोलणारे हिरवेगार शिवार भकास दिसू लागले. दुष्काळाच्या सावटाखाली बळीराजा डोळ्यात पाणी आणून पाऊस पडण्याचे वाट पाहू लागला. अखेर, वेळ हुकवून वरूनराजाचे आगमन झाले. आणि हवालदील झालेल्या शेतकऱ्यांना थोडाफार दिलासा मिळाला. अडखळत, अडखळत, का होईना..! पडणाऱ्या रिमझिम पावसाने गळीतगात्र झालेल्या पिकांना नवसंजीवनी मिळाली. पुन्हा संपूर्ण शेतशिवार हिरवागार झाला. शेतकऱ्यांच्या अशा पल्लवी झाल्यामुळे मोठ्या जोमाने कामाला सुरुवात झाली. मात्र, निसर्गाच्या कपटी हेतूने या आनंदावर सुद्धा विरजण पाडले.



अचानक, अज्ञात रोगाचा प्रादुर्भाव वाढला.आणि ऐन माल पक्व होण्याच्या मौसमातच शेंगा करपून त्यांची गळती सुरू झाली. जवळपास १३ एकर शेतातील ही अवस्था पाहून, रिसोड तालुक्यातील करडा येथील शेतकरी अरविंद केशवराव देशमुख यांनी एकच टाहो फोडला. जगावं की मरावं..!नटरंग चित्रपटातील खेळ मांडला.. या गाण्याचं वास्तवच जणू काही त्यांच्या डोळ्यासमोर उभा राहीलं. त्याचं थोडं विडंबन केलं तर, करपल्या शेंगा देवा, नुसतं हिरव शिवार..! आता न्हाई मनी धीर उरला.. निसर्गराजाने शेतकऱ्यांच्या नशिबाचा खेळ मांडला..!! रिसोड तालुक्यातील करडा या गावातील शेतकरी अरविंद केशवराव देशमुख यांनी मध्यंतरी पावसाने दिलेली ओढ व त्यातून उद्भवलेली पिकांची अवस्था पाहून, चार-पाच मजूर लावून पाण्याच्या आगमनापर्यंत १० ते १२ दिवस सतत सिंचन करून १३ एकर जमिनीतील सोयाबीन पीक वाचविण्यासाठी मेहनत घेतली. नंतर पाऊस सुद्धा पडला पिकाने उभारी घेतली. तशा, अरविंद भाऊंच्या शेतातील फेऱ्यासुद्धा वाढल्या. सर्वकाही अलबेला असताना, आता पिकावर अळ्यांचा हल्ला तर होणार नाही ना..! या शंकेपाई ते शेतात निरीक्षण करू लागले. तेव्हा, त्यांच्या लक्षात आले. की, आळी तर म्हणावी तशी दिसत नाही. पण, झाडाखाली मात्र करपलेल्या शेंगा गळून पडत असल्याचे त्यांच्या निदर्शनात आले. पुन्हा कीटकनाशक फवारणी करावी असा त्यांनी निश्चय केला. त्यासाठी ते दुसऱ्या दिवशी शेतात गेले. आणि दुसऱ्या दिवशीचे दृष्य पाहून शेतकरी देशमुख यांना घामच फुटला. जवळपास ८० ते ९० टक्के शेंगा गळून पडल्या होत्या. अशा भांबावलेल्या अवस्थेत अरविंद देशमुख यांनी याबाबतची माहिती रिसोड चे तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना देऊन पंचनामा करण्याची लेखी स्वरुपात मागणी केली आहे. आज दि. १३ रोजी कृषी अधिकारी श्री. वाघ, मंडळाधिकारी श्री. शिंदे व पटवारी यांनी देशमुख यांच्या शेतात जाऊन पाहणी केली असता, हा अतिउष्णतेमुळे आलेला व्हायरस असल्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे. याबाबत वरिष्ठांना माहिती देऊन त्यांच्या मार्गदर्शनात पुढील निर्णय ताबडतोब घेतल्या जाईल. असे आश्वासन संबंधितांनी शेतकरी अरविंद देशमुख यांना दिले आहे.



मध्यंतरी पावसाने दिलेली ताढण व त्यामुळे वाढलेली अतिउष्णता यातून निर्माण झालेल्या " व्हायरस "चा हा प्रकार आहे . अनेक शेतकऱ्यांच्या शेतात थोड्याफार प्रमाणात हा प्रादुर्भाव दिसून येत आहे . याला अकोल्याच्या पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी सुद्धा दुजोरा दिला आहे . या बाबतची संपूर्ण माहिती त्वरित वरिष्ठांना देणार आहे . . ! **वाघ साहेब, ( तालुका कृषीअधिकारी,रिसोड )**



साहेब माझ्या तेरा एकर शेतातील जवळपास ९०% सोयाबीनच्या शेंगा गळून पडल्या आहेत . उर्वरित १०% शेंगापैकी ५% शेंगा झाडावरच करपल्या आहेत . शिल्लक असलेल्या ५% शेंगासाठी, मला सदर सोयाबीन कापणीसाठी मजूर लावायला तरी परवडेल का . . ? उत्पादन खर्चासाठी घेतलेल्या कर्जाचा डोंगर डोक्यावर असतांना, आता सोयाबीनची अशी अवस्था झाली आहे . जगावं की मरावं हेच कळत नाही . . ! **अरविंद केशवराव देशमुख, ( शेतकरी, करडा ता . रिसोड )**



'पोळा अन् पाऊस झाला भोळा' असे म्हटले जाते. पाऊसच गायब झाल्याने कृषी संस्कृतीतला महत्त्वाचा सण पोळ्यावर दुष्काळाचे ढग आहेत. या दिवशी बैलांची पूजा केली जाते. वर्षभर ज्यांच्या मानेवर जू आहे, त्यांचे खांदे मळले जातात.

# भरपाईसाठी महाराष्ट्र एक्सप्रेस रोखली

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** लोहमार्ग रुंदीकरणात गेलेल्या जमिनीचा मोबदला मिळावा, अनाधिकृत सीमा हद्दीचे उभारण्यात आलेले खांब दूर करावेत या मागणीसाठी वसगडे (ता. पलूस) येथे सुमारे पाच तासांहून अधिक काळ महाराष्ट्र एक्सप्रेस रोखण्यात आली आहे. रेल्वे पोलीस सुरक्षा दलाचे अधिकारी तोडगा काढण्याच्या प्रयत्नात असून सायंकाळपर्यंत लोहमार्गावरील वाहतूक बंद होती.

मिरज-पुणे मार्गाचे दुहेरीकरण व विद्युतीकरणाचे काम करीत असताना लोहमार्गाच्या बाजूच्या जमिनी संपादित करण्यात आल्या. या जमिनीचा मोबदला अद्याप मिळालेला नाही. तसेच रेल्वे सीमा हद्दीसाठी शेतकऱ्यांच्या जमिनीत खांब रोवण्यात आले असून यामुळे गेल्या एक वर्षापासून या जमिनीत कोणतेही उत्पादन घेता आलेले नाही. याबाबत रेल्वे विभागाशी सातत्याने संपर्क साधून मोबदला मिळावा आणि अनाधिकृत उभारण्यात आलेले सीमाहद्दीचे खांब हटविण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. मात्र, रेल्वे प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे.

यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी बुधवारी दुपारपासून लोहमार्गावर ठिय्या मारला आहे. यामुळे कोल्हापूर ते गोंदिया जाणारी महाराष्ट्र एक्सप्रेस दुपारी एक वाजतापासून वसगडे हद्दीत उभी आहे. मिरज रेल्वे पोलीस, रेल्वे सुरक्षा दलाचे जवान घटनास्थळी थांबून आहेत. आंदोलकांना दूर करण्याचे प्रयत्न केले जात असले तरी शेतकरी आंदोलक ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत. ठोस कृती समोर आल्याविना रेल्वे मार्गावरून बाजूला होण्यास त्यांनी नकार दिला आहे.



# सरकार पडणार म्हणूनच भाजपने राष्ट्रवादी फोडली : अनिल परब यांचा दावा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गुरुवारपासून शिवसेनेच्या 16 आमदारांच्या अपात्रतेची सुनावणी सुरु होणार असून सर्वोच्च न्यायालयाने या संपूर्ण प्रकरणाचा निकाल जवळपास लिहून दिला आहे, आता फक्त सुनावणीसाठी अध्यक्षांकडे पाठवला आहे. त्यामुळे लवकरच याचा निकाल लागेल असे शिवसेना नेते अनिल परब यांनी सांगितले. हे 16 आमदार अपात्र ठरणार असून सरकार वाचवण्यासाठीच भाजपने राष्ट्रवादी फोडल्याचा आरोप त्यांनी केला.

अनिल परब आज पंढरपूरला दर्शनासाठी आले असता ते माध्यमांशी बोलत होते. ते म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्वे घालून दिली असून पूर्णपणे अर्थ लावूनच पाठवले आहेत. आता फक्त निर्णय घेणे बाकी आहे. सध्या हे सरकार वेळ काढण्याचा प्रयत्न करीत असले तरी सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांची भूमिका, घटनेतील 10 वे कलम या सर्व बाबतीत सांगितले असल्याने पक्षांतर्गत बंदी बाबत सर्व असलेले नियम आता स्पष्ट आहेत. यामुळे सध्या सरकार वाचवण्यासाठी वेळ काढूपणा सुरु असून हे 16 आमदार अपात्र होणे म्हणजे सरकार जाणे आहे. या 16 आमदारांमध्ये मुख्यमंत्री असून यापाठोपाठ इतर



23 आमदारांचे पिटिशन देखील बाकी असल्याने हा वेळकाढूपणा सुरु आहे.

आता सरकार वाचवण्यासाठी म्हणूनच राष्ट्रवादीतील लोकांचा पाठिंबा घेतला असावा असे अनिल परब म्हणाले. आमच्याप्रमाणे राष्ट्रवादीनेही आता अपात्रतेसंदर्भात कारवाई सुरु केली असल्याचे परब यांनी सांगितले. सध्या उद्धव ठाकरे यांच्यावर सुरु असलेली टीका या ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणे सुरु असून असे बोलण्यानेच त्यांचे त्यांच्या पक्षातील स्थान असल्याचा टोलाही अनिल परब यांनी राणे आणि वाघ याना लगावला.

मनोज जरांगे पाटलांचे उपोषण मराठा आरक्षणासाठी नव्हते तर मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी दाखल देण्यासाठी असल्याचे परब म्हणाले. मराठवाड्यातील मराठा समाजाला वंशावळ न पाहता सरसकट कुणबी दाखले मिळावे अशी त्यांनी मागणी केली आहे असं परब यांनी सांगितले. सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपण सिद्ध झाल्याशिवाय मराठा समाजाला टिकणारे आरक्षण मिळणार नाही. यासाठी योग्य इम्परिकल डाटा मागास आयोगाने देणे गरजेचे असल्याचे अनिल परब यांनी सांगितलं. सध्या कुणबी विरुद्ध मराठा, मराठा विरुद्ध ओबीसी असा वाद निर्माण होत असून सामाजिक वातावरण खराब होऊ लागल्याने यात राजकारण न करता प्रश्न सोडवावा अशी अपेक्षा परब यांनी व्यक्त केली.

# निपाहचा धोका वाढला

आधुनिक केसरी

देशातून करोना विषाणूचा संसर्ग कमी झाला असताना आता नव्या विषाणुचा धोका वाढला आहे. केरळमध्ये निपाह विषाणूमुळे दोन जणांचा मृत्यू झाल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. हा विषाणूही संसर्गजन्य असल्याने केरळमधील काही गावांना प्रतिबंधित क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलं आहे. तसंच, संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी सरकारने निर्बंध आणि उपाययोजनाही जाहीर केल्या. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. केरळमधील कोझिकोडे जिल्ह्यात एका नऊ वर्षाच्या मुलासह चार लोकांमध्ये निपाहचे विषाणू सापडल्यानंतर सरकारने हे पाऊल उचलले आहे. बाधित भागातील काही शाळा आणि कार्यालयेही बंद करण्यात आली आहेत. यापूर्वी केरळमध्ये २०१८ आणि २०२१ मध्ये निपाह संसर्गाचा उद्रेक झाला होता. केरळच्या आरोग्य मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, आतापर्यंत १४० हून अधिक लोकांची निपाह विषाणूची चाचणी घेण्यात आली आहे. विषाणूचा संसर्ग अधिक वाढू नये म्हणून सरकारकडून खबरदारी घेतली जात आहे. त्यामुळे बाधित भागातील सात ग्रामपंचायती कंटेनमेंट झोन म्हणून जाहीर करण्यात आल्या आहेत. कोझिकोडचे जिल्हाधिकारी ए गीता यांनी फेसबुक पोस्टमध्ये सांगितले की, सात ग्रामपंचायती कंटेनमेंट झोन म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. अटांचेरी, मारुथोंकारा, तिरुवल्लूर, कुट्टीयाडी, कयाकोडी, विलेपल्ली आणि कविलुमपारा या गावांचा त्यात समावेश आहे. पुढील सूचना मिळेपर्यंत कंटेनमेंट झोन म्हणून घोषित केलेल्या सात ग्रामपंचायतींच्या ४३ वॉर्डांमध्ये आणि बाहेर कोणालाही प्रवास करण्याची परवानगी दिली जाणार नाही. या क्षेत्रांत पोलीस बंदोबस्तही ठेवण्यात आला आहे. अत्यावश्यक वस्तू आणि औषधांची विक्री करणाऱ्या दुकानांना मात्र या क्षेत्रांत परवानगी असेल. अत्यावश्यक वस्तूंची विक्री करणारी दुकाने सकाळी ७ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू राहतील, तर आरोग्य केंद्रे आणि औषधविक्रेत्यांसाठी वेळेचे बंधन घालण्यात आलेले नाही. या क्षेत्रांत स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्राम कार्यालयांना कमीत कमी कर्मचाऱ्यांसह काम करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तर, बँका, इतर सरकारी किंवा निम-सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था आणि अंगणवाड्या बंद ठेवण्यात आल्या आहेत कंटेनमेंट झोनमध्ये लोकांनी मास्क घालावे, अल्कोहोल-आधारित सॅनिटायझर वापरावे आणि सामाजिक अंतर राखावे.

# नतद्रष्ट सामना



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**सरत्या आठवड्यात आपल्या देशाच्या राजधानीत जी-20 परिषद संपन्न झाली. ज्याचं अध्यक्ष पद भारताने भुषवलं. खरं तर हा कुणा व्यक्तीचा सन्मान नव्हे जागतिक पातळीवर नेतृत्व करायला संधी मिळणं तेव्हा भारतमातेचा सन्मान आणि नेतृत्व करणाऱ्या पंतप्रधानाचं भुषण. कदाचित आपल्या देशात प्रथमच पहायला मिळतं अपवाद असु शकेल. लोकशाहीच्या युगात माध्यम हा चौथा स्तंभ म्हणुन ओळखल्या जातो. मात्र जेव्हा एखाद्या दैनिकात लेखणी केवळ विरोधासाठी पाजळल्या जाते अशा नतद्रष्ट संपादक असो किंवा अग्रलेख लिहिणारे असो लेखणीच्या मालकाला जिथे भारतमातेचा सन्मान सहन होत नाही तिथे पंतप्रधानाची जागतिक पातळीवर वाढलेली लोकप्रियता सहन कशी होणार? हा सवाल आता देशातील सामन्य जनता विचारत आहे. देशवासियांनी जी-20 परिषद पाहिली.**

त्या निमित्ताने तब्बल वीस विविध देशांचे अध्यक्ष आणि परराष्ट्रमंत्री आपल्याकडे आले. भारतीय रूढी परंपरेनुसार त्यांचे झालेले स्वागत आगत्य आणि घेतलेला पाहुणचार त्यांच्यासाठीही कुतुहलाचाच विषय ठरला. पण जी-20 परिषदेला पुण्याच्या कसबा निवडणुकीचा संदर्भ देत सामनाने लिहिलेला अग्रलेख ज्याचा संताप युवकांच्यासह लहानग्याला सुद्धा आल्याशिवाय रहात नाही. देशाच्या इतिहासात आजवर अनेक पंतप्रधान होवुन गेले पण नरेंद्रजी मोदी असा एकच पंतप्रधान ज्याची लोकप्रियता केवळ 138 कोटी लोकांच्या ऱ्हदयात नव्हे तर जगाच्या पाठीवर यशाच्या शिखरावर जावुन पोहोचलेली हे एकदा मातोश्रीच्या संपादकाने लक्षात घ्यायला हवं. 2014 साली पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी भारतमातेचं नेतृत्व स्विकारलं. त्यांच्या व्यवस्था कार्यकाळाची नऊ वर्षे पुर्ण होताना देशात एक इतिहास घडवला. जागतिक पातळीवर जी-20 अध्यक्ष पद मिळाल्यानंतर सरलेल्या आठवड्यात राजधानीत परिषद संपन्न झाली. त्यासाठी तब्बल वीस देशाचे अध्यक्ष येवुन गेले. बलाढ्य अशा अमेरिकेचे अध्यक्ष देखील निमित्ताने आले होते. खरं तर राजकारण करायचं तिथं करावं पण देशाची अस्मिता आणि एक संघ दाखवण्याचा काळ जेव्हा येतो अशा वेळी विरोधकांनी देखील नको तिथे राजकारण करता कामा नये. इतर राज्यातले जावु द्या पण महाराष्ट्रात शिवसेना फुटीनंतर पक्ष चालवणारे बिथरल्यासारखे वागतात. त्यातही त्यांच्या पक्षात उभी फुट पडल्यानंतर ताणतणाव येणं साहजिक. पण त्याचे परिणाम सांस्कृतिक वागण्यातुनसुद्धा होताना दिसु लागले. मुखपत्र असलेल्या दै.सामनातुन अनेकदा वेगवेगळे विषय धरून अग्रलेख लिहिले जातात. खरं तर माध्यम लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणुन ओळखल्या जातो. सामान्य लोकांना त्यांच्याकडून अपेक्षा असतात. पण अलीकडच्या काळात एखादं दैनिक केवळ स्वतःचा विचार मांडून पक्ष चालवण्यासाठी काम करतं अशा वेळी त्या दैनिकाचा उद्देश सदृढ लोकशाहीसाठी घातक ठरू शकतो. सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी कदाचित एक वेळी माध्यमाची भुमिका समजावुन घेवु पण व्यक्तिद्वेष पराकोटीचा गाठताना ज्यांच्या डोळ्याला भारतमातेची अस्मिता देखील सहन होत नाही. अशा वेळी द्वेषाने पिछाडलेले डोळे धृतराष्ट्राच्या भुमिकेत जातात. परिणामी चांगलं दिसुन देखील चांगलं म्हणण्याची क्षमता त्यांच्यात शिल्लक रहात नाही. देशाच्या कानाकोपऱ्यातील सामान्य लोकांनी या जी-20 परिषदेचे स्वागत केलं. दिल्लीत दोन दिवस परिषद पार पडताना विशेषतः भारताने सांस्कृतिक रूढी परंपरा जतन करत बाहेरच्या पाहुण्यांना भारतमातेच्या संपुर्ण व्यवस्थेचे दर्शन घडवलं. मग स्वागत शिष्टाचार असेल, स्नेह भोजन किंवा परिषदेत मांडलेले ठराव. आम्ही देशाचं



नेतृत्व करताना भारतीय रूढी परंपरा सोडू शकत नाहीत. मानवतावाद आणि सबका विकास-सबका साथ हे आमचे सुत्र ज्याचा पुनउर्च्चार आपल्या पंतप्रधानांनी पाहुण्यांच्या समोर ठणकावुन केला. मुळात जागतिक पातळीवर नेतृत्व करायला संधी मिळणं आणि आपली लोकप्रियता जगाच्या पाठीवर प्रतिबिंबित करणं हे नव्हे येरागबाळ्याचे काम. ज्या पंतप्रधान नरेंद्र मोदींना परदेशात गेल्यानंतर राष्ट्राध्यक्ष आलिंगन देतात, अनेकजण चरणस्पर्श करून नतमस्तक होतात. अशी लोकप्रियता जगाच्या पाठीवर भारतीय पंतप्रधानाची कदाचित पहिल्यांदाच पहायला मिळते. हे तर विरोधकांनीसुद्धा मान्य करण्यासारखं पण जेव्हा राजकारण नसनसात सुडाचं आणि द्वेषाचं भरलेले असतं. अशा पक्षाचे नेते आणि त्या पक्षात काम करणारे संपादकीय माध्यमातुन लेखणी चालवणारे त्यांच्या पेनाला देखील तशाच प्रकारचे वळण असतं. स्वतंत्र अग्रलेख खरं तर कौतुकाचा असु शकते पण या महाशयांनी जागतिक परिषदेवर टिकेच्या शब्दांत स्वतंत्र अग्रलेख लिहिताना पाजळलेले दिवे बुद्धीची किव करावी असेच वाटते. नरेंद्र मोदी हे नेतृत्व स्वदेशात लोकप्रियतेच्या शिखरावर असुन तिसऱ्यांदा हॅटट्रिक केल्याशिवाय रहात नाही हे राजकिय भविष्य विरोधकांनीसुद्धा ओळखलेलं. त्याच त्रागातून अशी विखारी मानसिकता लेखणीच्या माध्यमातुन पाजळली जाते. गंमत बघा, पुण्याच्या कसब्यात पार पडलेली पोटनिवडणुक जिथे काँग्रेसचा विजय झाला तो संदर्भ दिल्लीत पार पडलेल्या जी-20 परिषदेशी जोडणं हाच खरा तर अग्रलेख लिहिणाऱ्या संपादकाचा पराकोटीचा बालिशपणा म्हणावा लागेल. मोदी नेतृत्वाच्या नऊ वर्षाच्या कारकीर्दीला लुच्चेगिरी आणि फसवणुक म्हणणाऱ्या संपादकाने या देशात ज्या काँग्रेसनं पन्नास वर्षापेक्षा अधिक राज्य केले त्या तुलनेत मोदी यांची नऊ वर्षे नेतृत्वाची गुणात्मक मुल्यांकन केलं खरं तर सामनाला हे पटणार नाही. कारण प्रामाणिकपणा त्यांच्याकडे नाही. पण सामान्य लोकांना कळुन चुकलं की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नऊ वर्षात देशाचं नेतृत्व करताना कल्याणकारी दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन गरिबाचं उत्थान केलं. शेवटच्या माणसाचं अंत्योदय हे करताना सबका साथ-सबका विकास करताना भारत हा सामर्थ्यवान, समृद्ध, शक्तिशाली देश असुन आमचा नाद करायचा नाही हे दाखवुन दिलं. खरं तर ज्यांना चंद्रयान हे केवळ टिकेसाठी वापरावं लागलं अशा नतद्रष्ट लोकांना चांगलं काय दिसणार? हा प्रश्न पडतो. जागतिक महाशक्ती भारत बनला असुन अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेनपासुन अगदी वीस राष्ट्र प्रमुखांनी त्याचा साक्षात्कार आपल्या देशात येवुन अनुभवला. स्वातंत्र्यानंतर ज्या प्रश्नाला तत्कालीन व्यवस्थेने केवळ मताचं लांगुनचालन करण्यासाठी कधी हातच घातला नाही. मग प्रभु रामचंद्र मंदिर उभारणी असेल किंवा 370 कलम बाजुला करणे असेल. असे अनेक स्वाभिमानाचे प्रश्न, अस्मितेचे प्रश्न नऊ वर्षाच्या कारकीर्दीत मार्गी लागले. शेतकऱ्यांना पगार देणारा एकमेव पंतप्रधान स्वातंत्र्यानंतर देशांनी पाहिला हे कमी नसे थोडेसे. आरोग्य चांगलं रहाण्यासाठी आयुष योजना एवढेच नव्हे तर उज्वला गॅस योजना या देशातील गरीब स्वतःचं घर मिळालं पाहिजे म्हणुन आयुष्यभर स्वप्नाळु रहातो. त्या गरिबाला एक घरकुल देण्याचा सुरू असलेला खटाटोप आणि सर्वात म्हणजे पारदर्शक काम करताना भ्रष्टाचारांना दाखवुन दिलेली त्यांची जागा. हे सर्व चांगलं काही कधीच मातोश्रीत बसलेल्या मालकाला दिसत नाही. मग त्यांच्या हाताखाली चाकरी करणाऱ्या संपादकाच्या पेनाला कसं दिसणार? असा सवाल आता सामान्य जनता विचारत आहे. इंडियाची टिमकी तुम्ही वाजवत असाल तरी ज्या पोरकट राहुलने स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान केला त्या माय-लेकरासाठी तुम्ही पायघड्या घालुन त्यांना हाताने घास घालता यापेक्षा दुर्दैव कोणतंच नाही. पोटनिवडणुकीचा संदर्भ आणि देशाच्या लोकसभा निवडणुकीचा संदर्भ यात कमालीचा फरक असतो हे तरी संपादकाने ओळखायला हवं. यदाकदाचित एखाद्या ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत इंडिया जिंकली तर तुम्ही म्हणाल पंतप्रधानाची लोकप्रियता कमी झाली? कारण तुम्हाला वैचारिक आणि तत्वाचं कधीच काही राजकारण कळालेलं नाही. केवळ स्वार्थापोटी तुमची राजकिय भुमिका 2019 च्या विधानसभा निवडणुकीत जनतेने पाहिली. जिथे लोकांनी महायुतीला निवडुन दिलं अन तुम्ही भाजपसोबत गद्दारी करत पुरोगाम्याच्या मांडीला मांडी लावुन बसलात. तुम्हाला महत्वाकांक्षा होती केवळ मुख्यमंत्री पदाची. वर्तमान राजकिय स्थितीत ज्या परिस्थितीचा सामना तुम्ही करत आहात ते केवळ कर्माची फळं भोगतात. कदाचित यापेक्षा अधिक दुर्दैवी वेळ तुमच्यावर येईल. तेव्हा तरी तुमच्या पेनाला द्वेष विरहित शब्दावळी मांडायची शिकवा हीच अपेक्षा. एक मात्र खरं म्हणावे लागेल भारताने जी-20 परिषद यशस्वी करून दाखवली. बलाढ्य जागतिक देश आपल्याकडे येवुन गेले. संपुर्ण जगाला मानवतेचा कल्याणकारी मंत्र आदर्श म्हणून आपण दिला. पण हे खरंय की .....ला गुळाची चव कशी येणार?

# अभाव धनाने नाही तर भगवत्प्राप्तीने पूर्ण होतो



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आयुष्यभर प्राप्त करण्या सारख जे जे काही आहे ते सगळं मिळवलं तरी देखील अभाव पुर्ण होत नाही हे कटु सत्य आहे. कारण अभाव हा भौतिक शक्ति साधनं अर्जित करण्याने नाही तर भगवत प्राप्ती ने पुर्ण होत असतो.संसार हे दुःखाचं मुळ असुन माया हे मृगजळा आहे संसारात भौतिक संसाधनांची गोडी आहे हा वरकरणी निर्माण होणारा अभास असुन तो फक्त आपल्याला धावण्यासाठी पुरेसा असतो . धावण्याची क्षमता संपल्यावर सगळं काही निरर्थक वाटत. आपण जी गोडी समजून धावत होतो ती गोडी मुळात क्षणिक असते . क्षणिक गोडी ने कोणतीही उणीव अभाव पुर्ण होत नाही.**

संसारात काहीही आणि कितीही भरमसाठ मिळवलं तरी पुर्णतः मिळत नाही. म्हणून जीवनाचं मुख्य लक्ष्य हे धन द्रव्य संपत्ती पद वैभव हे अर्जित करण नसुन पुर्णत्व प्रदान करणारी तृप्ती अर्जित करणं हेच मुख्य लक्ष्य असतं. हेच लक्ष्य अर्जित झाल्यानंतर कोणताही अभाव शिल्लक राहत नाही. अभाव म्हणजे उणीव हुरहूर मन शांत न राहण अथवा मन तृप्त न होणं या सगळ्या घटना घडामोडी म्हणजे अभाव मग जीवनाचा नेमका विचार केला तर अभाव काय असतो तोच शेवटच्या क्षणापर्यंत आपल्याला कळत नाही आणि कळत नाही म्हणून आपण धावत सुटतो आपण फक्त धावतो का धावतोय हे आपल्याला देखील कळत नाही. सुदैवाने जेव्हा कळत तेव्हा वेळ निघून गेलेली असते. आपण मानवी जीवनात कितीही संपत्ती संपदा भौतिक साधन सामुग्री मिळवली तरी देखील मन तृप्त होत नाही म्हणजे एक प्रकारचा अभाव हुरहूर कायम मनात असते. मनातील ही उणीव हा अभाव फक्त भगवत प्राप्तीने पुर्ण होऊ शकतो हे वास्तव आहे. जीवनातील अभाव हा भौतिक शक्तिने नाही तर अध्यात्मिक शक्तिने पुर्ण होत असतो. आपण मात्र संबंध जीवनभर या मुख्य गुहयापासून वंचित राहतो. जीवनात कितीही धन द्रव्य संपत्ती, पद वैभव अर्जित केलं तरी सुद्धा आपलंच काय तर जगातील कोणाचंही मन तृप्त होत नाही. मग आपलं चंचल मन का तृप्त होत नाही याचा वास्तविक विचार केला तर अभाव म्हणजे उणीव जीवनात कितीही काहीही मिळवलं तरी देखील माया नावाचं मृगजळ पूर्ण होत नाही आणि सतत एक अभाव कायम असतो. जीवनातील हाच अभाव पुर्ण करण्यासाठी आपण अहोरात्र शोधाशोध करत वेगवेगळ्या भौतिक बाबी अर्जित करत असतो. अमूक मिळवलं समाधान लाभेल तमुक मिळवलं समाधान मिळेल हा खेळ माया आयुष्यभर खेळायला लावते. हा



कधीच न संपणारा खेळ आपण खेळत राहतो. मायेचा खेळ खेळुन खेळुन थकलो तरी सुद्धा आपल्या मनात पुर्णत्व अथवा समाधान निर्माण होत नाही. समाधान अथवा उणीव अभाव संपुष्टात येण्याचा मार्ग आपण शोधण्याचा प्रयत्न करत नाही म्हणून तो आपल्याला योग्य वेळी सापडत नाही. धन द्रव्य संपत्ती ही जीवनात सात्विक मार्गाने उदरनिर्वाह आणि मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी मर्यादित स्वरूपात आवश्यक असते. चरितार्थ चालेल एवढं धन द्रव्य संपत्ती पुरेशी ठरते. ती अगदी सात्विक व सत्याच्या मार्गाने मिळु शकते. पण आपण मात्र कोणत्याही मार्गाने मन तृप्त व्हावं याच उद्देशाने भौतिक धन द्रव्य संपत्ती मिळविण्यासाठी सुस्साट धावत असतो. शेवटी धन हे निरर्थक निरपयोगी ठरत. धन द्रव्य संपत्ती अमाप असुन देखील मन शांती लाभत नाही याचं कारण तेच आहे कि धनात अभाव दुर करण्याचा प्रभाव नाही सामर्थ्य नाही. पण हेच सत्य आपल्याला उलगडत नाही म्हणून आपण धन द्रव्य या भोवती फिरतो आणि फिरून फिरून थकल्यावर भगवत प्राप्ती च्या दिशेने वाटचाल करतो. पण सुरवातीच्या टप्प्यात काळापासून भगवत प्राप्ती हा उदेश समजला तर जीवन कृतकृत्य होईल आणि आपला वेळ पण निरर्थक निरपयोगी जाणार नाही. पण दुर्दैवाने असं होतं नाही बहुतांश जवळपास सगळ्यांच्या संदर्भात असंच काहीसं घडत की अभाव निर्माण करणारी स्थिती भगवत प्राप्ती सरते शेवटी समजत. तेव्हा ते उमजुन उपयोग होत नाही. उपयोग होण्याच्या स्थितीत हे समजणं अंत्यंत आवश्यक आहे आणि हेच ज्ञान आध्यत्मिक ज्ञान आहे. अध्यात्म आणि ज्ञान समजलं तर निश्चितच भगवत प्राप्ती चा मार्ग दिसतो आणि निर्धास्त पणे हा मार्ग आपण यशस्वी पणे पुर्ण करून जीवनातील अभाव कायमचा संपुष्टात येतो.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



## बैलपोळा...!

वर्षभर राबणाऱ्या
बैलांचा सण हा पोळा,
न्हाऊ घालू तळ्यावर
पाऊस झाला या भोळा.

रेश्मी मखमली झुली
ऐणेदार अंगावर,
हिरवे लाल गोंडे आणि
फुगे बेगडी शिंगावर.

ढवळ्या-सरज्या- राज्या
सारे रंगले सजले,
वाजंत्रिंच्या  तालावर
गावभर मिरविले.

साऱ्या धन्याच्या दारात
करती मानाची पूजा,
ऐटीमध्ये चाखती या
पुरणपोळीची मजा.

सण एक दिन असे
जूं नसे बैलाच्या मानेवर,
मुके जीव पुन्हा-पुन्हा
राबतील  शेतावर...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण.
मो. ९७६४३५०३७४.

# मनोज जरांगे पाटील यांची मुलगी मराठा क्रांती मोर्चात

आधुनिक केसरी न्यूज



**बुलढाणा :** मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी व मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आज बुलढाण्यात सकल मराठा क्रांती मोर्चाने भव्य मोर्चाचे आयोजन केले आहे. या मोर्चामध्ये हजारोच्या संख्येने मराठा बांधव एकवटले आहेत. बुलढाण्यातील जिजामाता प्रेक्षागार येथुन मराठा क्रांती मोर्चाला सुरुवात झाली असून हा मोर्चा जयस्तंभ चौक जयस्तंभ चौक बाजार लाईन यामार्गे येऊन बुलढाणा जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन देण्यात येणार आहे. तर या मोर्चामध्ये मनोज जरांगे पाटील यांची मुलगी देखील सहभागी झाली आहे.

मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून ते २९ ऑगस्टपासून आंदोलन करत आहेत.

मनोज जरांगे पाटील यांच्या मनधरणीचे तीन प्रयत्न सरकारने केले, मात्र त्यांनी उपोषण मागे घेतलेलं नाही. मंगळवारी मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या समाजाची बैठक घेतली आणि सविस्तर भूमिका मांडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्या भेटीला आले तरच मी उपोषण मागे घेण्याचा विचार करेन असे त्यांनी म्हटले होतं. तसंच सरकारसमोर त्यांनी पाच अटीही ठेवल्या आहेत. आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे त्यांची भेट घेणार आहेत. त्यानंतर मनोज जरांगे पाटील उपोषण सोडण्याची शक्यता आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण जरी सोडलं तरीही आपण आंदोलन सोडणार नाही. एक महिन्यानंतर जोपर्यंत सरकार मराठ्यांच्या हाती जातीचं प्रमाणपत्र देत नाही तोपर्यंत घराचा उंबरा चढणार नाही अशी भीष्मप्रतिज्ञाही त्यांनी केली आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंतरवली सराटी गावात पोलिसांनी जो लाठीचार्ज केला त्यानंतर हे आंदोलन महाराष्ट्रभर पोहचलं. आता त्यांना पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा मोर्चाच्या वतीने विविध मोर्चे काढले जात आहेत. आज बुलढाण्यातल्या मोर्चात त्यांनी मुलगीही सहभागी झाली होती.

# भाजपा सरचिटणीसपदी उत्तम चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील देव्हारी येथील उत्तम चव्हाण यांची जिल्हा सरचिटणीस छत्रपती संभाजीनगर पदी निवड भारतीय जनता पार्टी रेल्वेमंत्री रावसाहेब दानवे यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा अध्यक्ष सुहास शिरसाट भाजपा संभाजीनगर ग्रामीण उत्तर यांच्या मार्गदर्शनाखाली व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर येथे दि ११ सप्टेंबर २०२३ रोजी पार पाडला यावेळी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातील पदाधिकार्यांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. यामध्ये उत्तम चव्हाण  यांची भारतीय जनता पार्टी जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, उत्तम चव्हाण  हे गेली १५ ते २० वर्षापासुन भारतीय जनता पार्टी मध्ये जिल्हात व सोयगाव तालुक्यात या सर्व जबाबदाऱ्यावर सध्या कार्यरत काम करत आहे. तसेच गेली १६ ते १७ वर्षापासुन सातत्याने वेगवेगळ्या सामाजिक संघटना सोबत महाराष्ट्राभर सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय असे कार्य करत आले आहेत. तसेच, सरपंच व शेती व्यवसाय करत असल्यामुळे सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याचे कार्य त्यांच्या माध्यमातून होत आलेले आहे. चव्हाण म्हणाले, की  भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक बांधनी करत असताना महाराष्ट्र राज्यभर प्रवास करुन केंद्रसरकारच्या व राज्यसरकारच्या संपुर्ण योजना सर्वसामान्य जनतेपर्यत पोहचण्याचा प्रयत्न करणार, जनजागृती करणार, तसेच पार्टीसाठी संघटनात्मक बांधणी मोठ्या प्रमाणात करणार अशी खात्री जिल्हा सरचिटणीस उत्तम चव्हाण यांनी यावेळी दिली. याप्रसंगी प्रदीप चव्हाण भाजपा तालुका उपाध्यक्ष, व भाजपाचे पदाधिकारी सुरज लोळगे, आप्पासाहेब काकडे, योगेश सोलाटे,सविताताई फुके,विजय काळे, मेघराज चोंडीये, ताराबाई खडके, विमलताई उठाडे वसंत बनकर उपस्थित होते.

# जुन्या पेन्शनसाठी दिल्ली संसद भवनावर विराट मोर्चा धडकणार

आधुनिक केसरी न्यूज

**पाटोदा :** 1 जानेवारी 2004 आणि दि. 1 नोव्हेंबर 2005 पासून केंद्र व राज्य सरकारने शासकीय निमशासकीय शिक्षक कर्मचाऱ्यांची सेवा निवृत्ती वेतन योजना बंद करून अंशदायी पेन्शन योजना देशात व राज्यात लागू केली. आर्थिक सामाजिक सुरक्षा संपुष्टात आणल्याने कर्मचारी वर्गासमोर जीवन जगण्याची असुरक्षितता निर्माण झाली आहे. यासाठी मागील 17 वर्षापासून प्रचंड विरोध सुरू असून संप/मोर्चे/धरणे/निषेध यासारख्या लोकशाही मार्गाने जुनी पेन्शन योजना लागू करावी आणि केंद्राने केलेला PFRADA कायदा रद्द करावा यासाठी कर्मचारी चळवळीचा संघर्ष सुरू आहे. मागील एक वर्षाचे कालखंडात राजस्थान छत्तीसगड झारखंड पंजाब हिमाचल प्रदेश आंध्र प्रदेश कर्नाटक सिक्किम पश्चिम बंगाल केरळ आधी राज्यांनी राज्य सरकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा क्रांतिकारक जनहिताचा निर्णय घेतला आहे महाराष्ट्रातील 14 ते 20 मार्च 2023 चा कर्मचाऱ्यांच्या संपाने सर्व राज्य सरकारांना हादरवून सोडले आहे. मात्र जोपर्यंत PFRADA कायदा रद्द होत नाही तोपर्यंत राज्य सरकारच्या अधिकाराला मर्यादा पडतात त्यामुळे देशभरातील दोन कोटी कर्मचारी वर्गणी PFRADA कायदा रद्द करण्यासाठी गेल्या वीस वर्षांपासून शासन कंत्राटी कर्मचाऱ्यांची अल्प वेतन मानधनावर नेमणूक करून शोषण करत आहे व त्यांना सेवेत नियमित न करणे समान काम समान वेतन माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार धोरण लागू न करणे यामुळे सर्व तरुण पिढी बरबाद होत आहे खाजगीकरण व कंत्राटीकरण याला सर्व कर्मचाऱ्यांचा विरोध आहे केंद्रीय व अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी संघटनांनी एकत्र येऊन दिनांक 3 नोव्हेंबर 2023 रोजी रामलीला मैदान ते संसद भवन जंतर मंतर पर्यंत देशभरातील दोन लक्ष कर्मचारी तथा कंत्राटी कर्मचाऱ्यांचा भव्य लाँग मार्च करण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे. मोर्चात सर्व कर्मचारी बांधवांनी सहभागी व्हावे, असे आव्हान बीड जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष बळीराम उबाळे उपाध्यक्ष अशोक चव्हाण जिल्हा सरचिटणीस नंदकिशोर परळकर कार्याध्यक्ष शिवलाल राठोड कोषाध्यक्ष उमेश हुलजुते जि प कर्म अध्यक्ष प्रदीप कुमार राठोड जि प अध्यक्ष श्रीकृष्ण वैराग्य स्थापत्य यांत्रिकी सहाय्यक चे जिल्हाध्यक्ष सचिन तांदळे, सचिव रुपेश कोकीळ साहेब, राज्य उपाध्यक्ष विलास बहिरवाळ इत्यादींनी केले आहे.

# लम्पी रोगाचा फटका बैलपोळा सण आनंदावर विरजण

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** लम्पी संसर्गजन्य चर्मरोगाने गत वर्षापासून धुमाकूळ घातला असुन यंदा पुन्हा डोके वर काढल्याने बैलपोळा सण आनंदावर विरजण पडले आहे.यंदा गोठ्यातच बैलपोळा सण साजरा करावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मिना यांनी केले आहे. हळद तेल करंज तेल निंबोळी तेल आयुर्वेदिक साहित्य घेवून वापरत खांदे मळणी करुन बैल वेगवेगळ्या ठिकाणी अंतराने बांधत बैलपोळा साजरा करावा असे आवाहन करण्यात आल्याने वार्षिक बैलपोळा साजरा करण्याच्या आनंदावर विरजण पडले आहे.




महाराष्ट्र Business Katta

तिरुपती
मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

CAFÉ ROCKSTARZ
EAT. CHILL. REPEAT
11:11
ELEVEN ELEVEN
Where Dishes come True..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# बैलपोळ्याचा सण आला पण माझं काय...?



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**सणापाठोपाठ सण येतात अन् जातात कोणी आनंदाने सण साजरे करतात पण, माझ्या जीवनात मात्र बाराही महिने संकटे वरचेवर येत असतात अहो, ओळखले का मजला मी बळीराजा बोलतोय मला जगाचा पोशिंदा म्हणतात पण,मी राजा तरी कसला...? दरवर्षीच्या नापिकीमुळे, दुष्काळामुळे, निसर्गाच्या कोपामुळे, वनप्राण्यांच्या हैदोसामुळे सोबतच शासनाने माझ्याकडे लक्ष नसल्यामुळे आज मी एक, एक सेंकदाला जीवंतपणी मरत आहे. मग आपणच सांगा मी कोणाला न्याय मागायला जावू...? एकीकडे निसर्ग कोपत आहे तर दुसरीकडे बहरलेल्या पीकात वनप्राण्यांचा कडप तांडव करत आहेत हिरवेगार पिकाचा मातीमोल करत आहेत माझ्या पिकाची अवस्था पाहून डोळ्याला, डोळा लागत नाही.**

कारण आज माझ्या पिकाची अवस्था या प्रकारची झाली आहे की, मी वर्षभर काय खाणार...? माझ्या कुटूंबाचे पालनपोषण कसे करणार. ..? आज बैलपोळ्याचा सण वर्षातून एकदा आला खरं पण माझ्या सर्जा राजाला मी सजवू तरी कसा..? कारण, पहिले सारखे आता दिवस राहिले नाही ह्या महागाईच्या तडाख्यापायी माझ्या सर्जाला सुद्धा कमी भावात विकून टाकावे लागले आणि आजच्या दिवशी त्याची मला खूप आठवण येत आहे सर्जाचे व बळीराजाचे नाते किती घट्ट असतात कसे कळणार तुम्हाला. ...? पण मला सर्व कळते काय करू मी माझा जीव त्याच्यासाठी तुटतो आहे. माझ्या सर्जासाठी आजचा दिवस होता पण तो माझ्या घरी नाही त्याच्याविना माझा अंगण, गोठा, घर सुना पडला आहे. त्याच्या शिवाय मला करमत नाही कारण तो माझ्या मुलासारखा होता.त्याचे ऋण माझ्यावर आहेत पण काय करू नाईलाजाने त्याला विकावे लागले अनेकदा हा पाऊस असा पडतो की तोडांवरचा घास हिसकावून घेऊन जातो. अन् जेव्हा गरज असते तेव्हा, बेईमानी करतो मग मला आधार तरी कोणाचा आहे. ..? क्षणाक्षणाला मी मरत असतो तर जगणार तरी कसा ...? मी जगाचा पोशिंदा आहे काय पदवी मिळाली आहे मला व्वा, व्वा कदाचित माझा अंत बघण्यासाठी दिली असावी म्हणून तर माझ्याकडे पूर्णपणे सर्वांनी मिळून पाठ फिरवली आहे. नकळताच मला सर्व काही कळत आहे. गेल्या दोन महिन्यापूर्वी टोमॅटोचे भाव का वाढले होते न बोलणारे सुद्धा बोलायला लागले होते पण, आज मी संकटाच आहे तर मात्र सर्वजण मुके, बहिरे, आंधळे, अज्ञानी झाले आहेत हे असे, कसे होऊ शकते...? म्हणजे कदाचित मी नकोसा वाटत असेन म्हणून तर माझा कोणीही विचार करत नाही. मी कोणकोणत्या संकटांविषयी बोलणार विजेच्या वाढत्या बिलाविषयी की,माझ्या मालात भाववाढ होत नाही या विषयी बोलणार तरी कसा माझे बोलणे कोणी ऐकून घेतील तेव्हा नं असो, मी जगलो तर काय आणि मेलो तर काय कोणालाही फरक पडत नाही पण, माझ्या कुटूंबाला मात्र



अफाट संघर्ष करावा लागतो हे शंभर टक्के खरे आहे. कोणी तुपाशी आहे तर माझ्या सारखे असे कित्येक बांधव संकटाला तोंड देऊन जगत आहेत आज बैलपोळ्याचा सण आहे खरा पण,माझ्या डोळ्यात मात्र अश्रू आहेत कारण हे अश्रू वाहतच राहणार आहेत पुसणारे कदाचित जन्माला यायचे असणार मी कितीही टाहो फोडून रडत बसलो तरी फायदा होणार नाही म्हणून आता असं वाटते की, मी जगावे की, मरावे...? जगाला पोसण्या पुरता मी उरलो आहे बाकी, मज्जा मात्र दुसरेच करतात जर माझ्याकडे लक्ष द्यायला त्यांच्याकडे थोडासा वेळ राहिला असता तर आज मला असे म्हणावे लागलेच नसते पण वारंवार म्हणावे लागते हि फार मोठी शोकांतिका आहे. काही गोष्टीची एक मर्यादा असते पण,यांनी तर सर्वच मर्यादा पार केलेली आहे आपल्या राजकारणात मस्तपैकी दंग होऊन या पोशिंद्याला सुद्धा विसरून गेले आहेत हे,नाकारता येत नाही. म्हणून मी माझ्या शेतकरी बांधवाना म्हणू इच्छितो की, शेतकऱ्यावर वारंवार होत असलेला अन्याय सहन करण्याऐवजी एकत्र येऊन लढले पाहिजे व आपली एकता जगाला दाखवून दिली पाहिजे बळीराजा कोणाचा नौकर, चाकर नाही तर जगाचा पोशिंदा आहे. तेव्हाच या जगात जगता येईल एक दिवस आपलाही येईल. तरीही का होईना बैलपोळ्याच्या सर्वांना शुभेच्छा देतो जरी तुम्ही विसरले असणार तरी मी मात्र कोणालाही विसरत नाही.

# मंगळसूत्र फॅशन म्हणून वापरू नये



सुरज रामचंद्र अंगुले
संपर्क : ७७१९८७६३१३

आधुनिक केसरी

**आपल्या भारत देशात स्त्रिया मंगळसूत्र घालतात. मंगळसूत्रामुळे पतीचे दीर्घायुष्य लाभावे म्हणून घातले जाते.स्त्रियांच प्रतीक मानलं जातं,ते अगदी बरोबर आहे. आज आज या काळात मंगळसूत्र हे फॅशनच्या स्वरूपात आपणास पहावयास मिळतात. तुम्ही फॅशन म्हणून वापरता का?त्याच मूल्य काय आहे?तुम्ही प्राचीन काळापासून चालत आलेली परंपरा जपतो आहे,मग या आधुनिक काळात त्याचा वापर कुठे आहे तर कुठे नाही काही ठिकाणी दिसतो आहे. भारतातील विवाहित महिला मंगळसूत्र घालतात हे आपल्याला काही नव्याने सांगायला नको. हिंदू संस्कृती नुसार, मंगळसूत्र परिधान करून थेट पतीच्या दीर्घायुष्यासाठी संबंधित आहे असे मानले जाते.**

मंगळसूत्रामुळे पती पत्नीचे प्रेम आणि बांधीलकी ठेवते. म्हणून लग्न झाल्यावर मुलींना मंगळसूत्र घातले जाते. आजकाल मंगळसूत्राच्या डिझाईन मध्ये बरेच बदल होत आहेत. परंतु आजही मंगळसूत्र काळा मणी आणि दोन डवली सारखेच मानले जाते दक्षिण भारतात आजही या दोन कपवाले डिझायनर मंगळसूत्र फक्त परिधान केले जाते. पण येथे काळ्यामणिऐवजी हळदीवाला एक धागा असतो. सोन्याचे दोन कप आणि काळ्यामन्यापासून मंगळसूत्राचे गुणधर्म असतात. सोन्याचे दोन कप सत्वा-गुणाला जोडलेले आहेत,जे शिवाची शक्ती प्रतिबिंब करते आणि हृदय सदृढ ठेवते. या कपची ओळख कोणत्याही प्रकारचे नक्षीकाम केलेले नसावे.त्याचवेळी,काळा मणी, काळी नजर आणि नकारात्मक शक्ती पासून बचाव करते.पण विज्ञानी तत्वज्ञानानुसार मंगळसूत्रामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि शरीर निरोगी ठेवले जाते.पण एवढे लक्षात ठेवा की, मंगळसूत्र छातीजवळ असावे पण कपड्यावर नसावे.आयुर्वेदानुसार सोन्याच्या मंगळसूत्राच्या दोन कपात अत्यंत महत्वाचे गुणधर्म आहेत.ते असे की,ते हृदय सदृढ ठेवते. याबरोबर मंगळसूत्रामधील तीन गाठी विवाहित जीवनाचे मुख्य मुद्दे दर्शीवतात. प्रथम गाठ एकमेकांविषयी आज्ञाधारककता दाखवते, द्वितीय गाठ म्हणजे आई वडिलांच्या प्रति प्रेम दर्शीवतात आणि तृतीय गाठ देवाच्या प्रति असलेला सन्मान प्रेम दर्शीवते. मंगसळसूत्रात दोन पदरी दोऱ्यात काळे मणी दोन लहान वाट्या असतात. दोन दोरे म्हणजे पती पत्नीचे बंधन, दोन वाट्या म्हणजे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ मुख्य आहेत. मंगळसूत्रामधील काळे मणी आणि वाट्या याचा अध्यात्मिक अर्थ खूप मौल्यवान आहे अणि ते जपण्याचं काम तुमच्याच हातात आहे. मंगळसूत्राच्या दोन वाट्यामध्ये एक वाटी शिवाचे, तर दुसरी वाटी शक्तीचे प्रतीक असते.शिव शक्तीच्या बळावर वधूने सासरच्या मंडळीचे रक्षण आणि सांभाळ करायचा असतो.या दोन वाट्याना गुंफणारी तार ही माहेरच्या कुलदेवतेची उपासना सोडून आता सासरच्या कुलदेवतेची उपासना करण्यासाठी हिंदू धर्माने दिलेल्या परवानगीनुसार आदान-प्रदानाचे दर्शक आहे. माहेरच्या वाटीत हळद,तर सासरच्या वाटीत कुंकु भरून, कुलदेवीला स्मरून, मंगळसूत्राची पुजा करून मगच गळ्यात घालतात. खर तर टिकली, मंगळसूत्र आणि जोडवे हे आपल्या परंपरेचा आणि संस्कृतीचा एक भाग आहे.त्यामागे शास्त्रीय कारण सुध्दा आहेत. लग्न झालेल्या स्त्रियांचा हमखास हा शृंगार असतोच, पण या गोष्टी जर एखादीला आवडत नसेल तर ते लादण्यास काहीच अर्थ नाही. परवाच घरी पाहुणे आले,एक आजीबाई होत्या आल्याआल्या तिच्या पायाकडे त्यांचे लक्ष गेले आणि डोळे मोठे करून,जोडवे कोठे अहेतब? हे प्रश्न विचारल्यानंतर मग काय उत्तर द्यावे सुचेना कॉलनीतल्या बायका गॉसिप करतात, अगं आमक्याची सून काहीच घालत नाही बर काही संस्कारच नाहीत, अहो तुम्हाला असलं मिळालं नसेल काहीपण म्हणून दुसऱ्याला का नाव ठेवता? हा माझा अनुभव आहे. लग्न झालेली स्त्री कोणासमोर आली की, तिला पायाच्या नखापासून ते डोक्याच्या केसापर्यात न्याहळत असतात,कुठे काही कमी आहे का? नाकात, कानात, पायात सगळं आहे का हे लोक बघत असताना समोरच्यालासुद्धा समजतं की, आपण तिच्याकडे अशा नजरेने बघतोय की सवयीने या गोष्टी करण खरंच सर्वांना हा अनुभव असेल. भलेही त्या स्त्रीमध्ये एखादी चांगली कला असेल, ती उच्च शिक्षित असेल पण शृंगारासमोर या सर्व गोष्टीना दुय्यम मानणाऱ्या व्यक्ती खरंच डोक्याला ताप आहे ना?पाहुण्यांनी यावं स्त्रीच्या शृंगारापेक्ष्या तिच्यातले गुण पहावे, तिच्याशी तिच्या शिक्षणाबद्दलच्या करियर संबंधित विचारपूस करायला किती लोकांना जमत? टिकली मंगळसूत्र घालणे ही सक्ती नसून आजच्या काळात आपापल्या आवडीनिवडीचा भाग आहे,त्यासत हे कोणाला आवडत नसेल तर नक्कीच निर्बुद्धपणे हा करू केवळ लोकांसाठी करण्यात काहीही अर्थ नाही. साडीवर हा शृगार उठून दिसतो यीस्ट काही शंका नाही, पण निदान जिन्स शर्ट वर तरी या सर्वांची सक्ती नका करु, नाही तर देश आणि विदेशाची भयंकर फॅशन एकत्र आल्यासारखी दिसते.आजकाल कित्येक स्त्रीया हे सर्व न घालणं पसंद करतात आणि त्याच्या या निर्णयामुळे आदर व्हायला हवा, शेवटी प्रत्येकाला स्वातंत्र्य, मत आहेत.
एखाद्या स्त्रीचे व्यक्तिमत्त्व लग्नाआधी खुप सुंदर असते, मात्र लग्न झालं की, तिच्यावर हा शृंगार लादून तीच व्यक्तिमत्त्व बदलून टाकणं हे तर मला न पटण्यासारखे आहे.

# कवितेची जन्मकथा : ऋण : श्री. दि. इनामदार



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**एखादा सहज प्रसंग, किंवा आपला भोवताल आपल्या मनावर सतत मोहिनी घालत असतो. त्याचे पडसाद आपल्या मेंदू आणि मनावर पडत असतात. हे पडसाद जेंव्हा शब्द रूप घेऊन साकार होतात तेंव्हा ती एक चिरंतन रचना असते असे मला नेहमीच वाटते. एखादा बैल आपल्याला सहज दिसतो आणि त्याच्याकडे पाहिल्यावर एखादेवेळी संपूर्ण जीवनाचे तत्वज्ञान सांगणारी कविता निर्माण होते ही खरी प्रतिभेची देणगी आहे. एखादा कवी किंवा लेखक समोरच्या जीवाची वेदना स्वतःची समजून व्यक्त होतो आणि त्या दुःखाची सल त्याला स्वतःला बोचायला लागते तेंव्हा त्याच्या मनावर उमटणारे स्पंद हे निश्चितच त्याच्या सर्वोत्कृष्ट निर्मितीची पायाभरणी करत असतात. अशीच एका प्राण्याकडे पाहून त्या प्राण्यांच्या मनाच्या तळापर्यंत जाऊन त्या प्राण्यांच्या मनात काय भाव असतील ह्याचा शोध घेत कवी श्री. दि. इनामदार ज्यांचा जन्म 5 फेब्रुवारी 1928 रोजी खामगाव ह्या गावी झाला. (त्यांना 'मराठवाड्याचे रवींद्रनाथ टागोर असे म्हटलें जायचे ) ह्यांनी लिहिलेली ऋण ही अशीच एक कविता होय.**

**माझ्या कातड्याचे जोडे तुझ्या पायात वाजू दे ....**

बैल म्हणतो की, "अशा गोड आठवणींची मी रवंथ करीन, वाईटाच्या आठवणी आपल्या शेवटीच्या दिवसात आठवू नये. जे काही चांगले क्षण आपल्या वाट्याला आलेत त्याचे रवंथ करत म्हणजेच खाल्लेला चारा पुन्हा तोंडात आणून त्याचे बारीक चर्वण करण्याचा बैलाचा गुणधर्म ह्या ठिकाणी कवींनी कवितेत खूप चपलखपणे वापरला आहे. आणि तुझी खुशाली चिंतताना मला मरण येऊ दे ह्या भूमिकेतून आपल्या धन्याचे कुशल आणि मंगल झालेले पाहून मरण यावे ही बैलाची उदात्त भावनाही कवींनी मांडली आहे. वर्तमाना काळात माणसाच्या मनातही एकमेकाप्रती ऋणानुबंधाच्या स्नेहभावना उरल्या नाहीत, अश्या काळात एका प्रामाणिक प्राण्यांचा हा जिव्हाळा पाहून डोळ्यातून अश्रू येतात. त्याच्यावर केलेल्या मायेचे ऋण चुकवण्यासाठी त्याला पुन्हा बैलाचाच जन्म हवा आहे आणि तोही याच धन्याच्या शिवारात हवा आहे बरं यावरच तो थांबत नाही त्याची अखेरची इच्छा व्यक्त करताना तो म्हणतो की, " मी मेलो तर माझ्या कातड्याची इतस्ततः विल्हेवाट न लावता त्याचे जोडे करून धन्याने ते पायी घालावेत, तेव्हढीच माझ्या धन्याची पायधूळ कातडीस लागेल. अशीच अपेक्षा व्यक्त करत कित्येक म्हातारी माणस लेकच्या पोटी पुन्हा जन्म घेतो असे म्हणत जीव सोडताना आपण पाहिले आहेत. स्नेह, माया, आस्था आणि जिव्हाळा यांचा ऋणानुबंध काळजाला भिडेल अशा शब्द शैलीत मांडून ग्रामीण जीवन आणि प्राण्यांची प्रामाणिक भावना अतिशय प्रवाहीपणे कवितेतून मांडणारी ही कविता संवेदना बधीर झालेल्या माणसांना बरेच काही सुचवून जाते असे म्हणावे लागते. जगण्याचे आणि मरण्याचे इप्सित काय असू शकते याचे हळुवार वर्णन ही कविता करते.
शेतीमातीत रमलेला शेतकरी आणि त्याच्या खांद्याला खांदा लावून काम करणारा बैल ह्यांचे वर्णन करणारा वृषभसूक्त नावाचा संपूर्ण कविता संग्रह ज्या प्रभावीपणे विठ्ठल वाघाच्या मनातील बैलाचे विविध रंग दाखवितो किंवा लोकनाथ यशवंत ह्यांची शेतमजुरांचे दुःख संदर्भातील बैल ही कविता ज्यात शेवटी बैल एक व्याकुळ प्रश्न विचारतो "अन मालक तरीही तुम्हीच आत्महत्या करता?" ही अंगावर येणारी परिणामकारकता असो वा ऋण कवितेतील श्री द ईनामदार ह्यांनी घरातील वयोवृद्ध आणि खुंट्यावरील म्हातारा बैल ह्यांचे तादात्मीकरण करून एका विलक्षण भावपातळीवर माणसाच्या कृतघ्न वृत्तीवर मारलेला फटकारा असो, सर्वच चिंतनीय आहे. मात्र मोहंजोदरो आणि हडप्पा संस्कृती पासून बैल हा एक श्रमिक प्राणी आहे, शक्तीचे प्रतीक आहे, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक प्रतिष्ठा लाभलेल्या ह्या प्राण्यांचे जीवन जाणणारा संवेदनशील माणूस या कवितेत आर्त भाव मांडतो आणि तेवढीच संवेदनशीलता मनामध्ये हिरवी असेल तर वाचक तो भाव सहज उमजून घेतो, ज्यांची मनेच बधीर झालीत अन संवेदना बोथट झाल्यात त्यांना ह्या कवितेकडे एक शब्दलयबद्धता म्हणून पाहण्याची दृष्टी आपण बदलू शकत नाही हे ही तेवढेच खरे. 31 डिसेंबर 2013 रोजी निधन झाले तरी ऋण सारख्या भावनिक कवितामुळे श्री दि इनामदार कायमस्वरूपी आपल्या मनात घर करून आहेत . अनेकांना वरील तुकड्यातून व्यक्त होणाऱ्या काव्यापेक्षा कविता सलग वाचावी अशी प्रबळ भावना असते त्यांच्या साठी संपूर्ण कविता,

**तुझ्या शेतात राबून माझी सरली हयात**
**नको करू हेटाळणी आता उतार वयात ॥ १ ॥**
**नाही राजा ओढवत चार पाउले नांगर**
**नको बोलूस वंगाळ नको म्हणूस डंगर ॥ २ ॥**
**माझ्या ऐन उमेदीत माझी गाईलीस ओवी**
**नको चाबकासारखी आता फटकारु शिवी ॥ ३ ॥**
**माझा घालावाया शीण तेव्हा चारलास गूळ**
**कधी घातलीस झूल कधी घातलीस माळ ॥ ४ ॥**
**अशा गोड आठवणी त्यांचे करीत रवंथ**
**मला मरण येऊ दे तुझे कुशल चिंतीत ॥ ५ ॥**
**मेल्यावर तुझे ठायी पुन्हा एकदा रुजू दे**
**माझ्या कातड्याचे जोडे तुझ्या पायात वाजू दे ॥ ६ ॥**

# स्त्रियांच्या भावविश्वाचे अनेक पदर उलगडणाऱ्या कविता



प्रा. संजय सूर्यवंशी
९४२०५५७९००

आधुनिक केसरी

**परिघाबाहेर या पहिल्या काव्यसंग्राहाने कवयित्री म्हणून ज्यांना मराठी साहित्यात ओळख मिळवून दिली त्या आशा डांगे यांचा नुकताच " प्रिय हा कण गॉड पार्टिकल आहे " हा दुसरा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. दैनंदिन जीवनात आलेल्या अनुभवाच्या जोरावर कवयित्रीचे काव्यसौंदर्य बहरत जाऊन ते अधिक सुगंधीत आणि बोलके झाल्याची साक्ष " प्रिय हा कण गॉड पार्टिकल आहे " हा काव्यसंग्रह देताना दिसून येतो.**

आशा डांगे यांची कविता या काव्यसंग्रहामुळे अधिक परिपक्व होऊन नवतेजाचे क्षितिज कवेत घेण्यासाठी ती झेप घेताना आपल्याला दिसून येते. वैचारिक अधिष्ठानाला बळकाटी प्राप्त करून देणारे काव्यातील बलस्थाने, प्रतिमा, प्रतीके, समाज जीवनातील अनुभव यांच्या जोरावर कवयित्रीने मराठी साहित्य क्षेत्रात आपले स्वतःचे स्थान भक्कम केल्याचे दिसून येते.

स्त्री आणि स्त्रीयांचे सामाजिक जीवन, त्यांना आलेले बरे - वाईट अनुभव आणि त्यातून निर्माण होणारी मनाची अस्वस्थता, खदखद ,बंडाची भाषा , बंड करण्यारी प्रवृत्ती, पेटून उठण्याची उर्मी या मुळे कवयित्रीची काव्य भाषा अधिक बोलकी होऊन ती वाचकांच्या मनाचा ठाव घेण्यात यशस्वी होते. मानवी अहंकारातून तिला स्त्रीधर्म कसा जपावा लागतो या विषयी त्या आपल्या स्त्रीधर्म या कवितेत म्हणतात.

**" हे सारे भोगते, सोसते, जगते**
**ती आयुष्यभर कारण**
**तिचा एक धर्म आहे**
**' स्त्री धर्म ' तिच्या भोवतालचं जग मात्र**
**नेहमीच विसरतो स्वतःचा मानवधर्म**
**तिच्याकडे स्त्री म्हणून पाहताना**

कवयित्री मानव म्हणून स्वतःकडे पाहत असताना स्त्रीकडे मात्र मानव म्हणून न पाहता तिने स्त्रीधर्माचं अस्तित्व जपलं पाहिजे अशी अपेक्षा करत असतो हीच अपेक्षा कवयित्रीच्या मनाला अस्वस्थ करून सोडते.

पुरुषांच्या वासना युक्त नजरेतून स्त्रियांची होणारी हतबलता आणि अस्वस्थता मुस्कटदाबी यावर भाष्य करताना त्या आपल्या कवच कुंडल या कवितेत असं म्हणतात

**" बाई नुसतं**
**शरीर पाहून**
**स्खलित होणारा**
**तुमचा पुरुषार्थ**
**मला नेहमीच**
**जाणीव करून देतो**
**मी असुरक्षित असल्याच."**

पुरुषार्थाच्या पोकळ गप्पा मारणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये आजही स्त्री कशी उपेक्षित आहे आणि संविधानाने दिलेल्या सुरक्षिततेच्या अधिकारापासून ती वंचित आहे हा भाव अर्थ या कवितेतून स्पष्ट होतो.

एकीकडे माणसाच्या गर्दीने गजबजलेली शहरे आणि गगनचुंब इमारतीच्या सौंदर्याने नटलेली शहरे कशी फसवी व मतलबी निघतात, मानवी संवेदना हरवून बसतात अशा शहरांमध्ये नाईलाजाने ती एक भाग होऊन जगत असते याची खंत त्या आपल्या शहर या कवितेमध्ये म्हणतात.


**" या गगनचुंबी इमारती**
**हृदयाची खोली कमी करत चालल्यात**
**मी ही या शहराचा**
**एक भाग होत चाललेय "**

" प्रिय हा कण अनादी काळापासून गॉड पार्टीकल आहे हे कसं विसरतोस तू ? अनादी काळापासून त्या कणा भोवतीच स्त्रीच आयुष्य बहरत , फूलत आलेल आहे. ती त्याला जीवापाड जपत आलेली असल्यामुळेच ती म्हणते प्रिय हा कण गॉड पार्टीकल आहे जिव्हाळा, गोतावळा, संसाराची ओढ ,आपलेपणाची भावना या सर्व चौकटीच्या अवतीभवती स्त्री ला खेचून ठेवण्यात व कायमचा आकर्षित करण्यात हा कण यशस्वी ठरतो हा भाव या काव्यसंग्रहातून व्यक्त होताना दिसून येतो.

आपली कविता काय व्हावी या विषयाची तळमळ आणि आपुलकी व्यक्त करताना त्या आपल्या जीत व्हावी कविता या कवितेत

**"अन्यायाविरुद्धचा**
**जागर व्हावी कविता**
**सुखाच्या क्षणाचा**
**सागर**
**व्हावी**
**कविता "**

आपली कविता अन्यायाविरुद्ध जागर करण्यासाठी व चांगल्या क्षणांचा सागर होण्यासाठी पुढे आली पाहिजे ही अपेक्षा त्या व्यक्त करताना दिसून येतात.



या काव्यसंग्रहाचा एकूणच आशय -विषय अत्यंत साध्या, सरळ व सोप्या भाषेत मांडण्यात आलेला असल्यामुळे हा काव्यसंग्रह अधिक बोलका झालेला दिसून येतो. या काव्यसंग्रहात एकूण 47 कवितांचा समावेश करण्यात आलेला आहे.स्त्रियांची होणारी घुसमट, मुस्कटदाबी , अस्वस्थता कोंडमारा , त्यांच्यावर होणारे अन्याय अत्याच्यार यासारखे विषय आशा डांगे यांना बेचैन करतात ,अस्वस्थ करतात म्हणूनच त्यांची कविता बंडाचा झेंडा हाती घेऊन न्यायचा दरवाजा ठोठावतांना दिसून येते. एकूणच या सर्व प्रकारच्या संघर्षातून स्त्री ही आत्मसन्मानाने उभी राहून तिने स्वाभिमाणाचे जीवन जगले पाहिजे ही एकमेव आशा कवयित्री या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून व्यक्त करताना दिसून येतात. एकूणच त्यांच्या या काव्य प्रवासामुळे मराठी साहित्य विश्वाला एक नवा आयाम मिळवून देण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न वाखाण्याजोगा आहे व तो स्वागतार्य आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी व लेखन कार्यासाठी खूप खूप शुभेच्छा ! काव्यसंग्रह : प्रिय हा कण गॉड पार्टीकल आहे, एकूण पृष्ठे : १०४ प्रकाशन :गोदा प्रकाशन, औरंगाबाद किंमत :१५०/-

# कॅडेव्हर किडनी : प्रत्यारोपण गरज काय?




श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**किडणी- मुत्रपिंड प्रत्यारोपण ही चिकित्सा विज्ञानाने केलेल्या अत्युच्च प्रगतीची विशेष खून आहे. क्रॉनिक किडनी फेल्युअरच्या शेवटच्या अवस्थेतल्या उपचारांना हा उत्तम पर्याय आहे. यशस्वी किडणी प्रत्यारोपणानंतर रोग्यांचे आयुष्य इतर व्यक्तींप्रमाणेच निरोगी आणि सामान्य होते. सद्या अनेक जन या व्याधीने ग्रस्त राहून जर्जर होत आहेत. या व्याधीविषयी पूर्व माहिती राहावी आणि लोकांतील धास्ती कमी करावी. किडणी प्रत्यारोपण या विषयाची चर्चा आपण चार भागांत करणार आहोत- १) किडणी प्रत्यारोपणापूर्वी जाणून घ्यायच्या गोष्टी. २) किडणी प्रत्यारोपण ऑपरेशनबद्दलची माहिती. ३) किडणी प्रत्यारोपणनंतर जाणून घ्यायची आवश्यक माहिती. आणि ४) कॅंडेव्हर किडणी प्रत्यारोपण.**

किडणी प्रत्यारोपणापूर्वी जाणून घ्यायच्या आवश्यक गोष्टीः-किडणी प्रत्यारोपण म्हणजे काय? तर, क्रॉनिक किडणी फेल्युअरच्या रोग्यांत अन्य व्यक्तीची (जिवंत वा मृत) एक निरोगी किडणी ऑपरेशनद्वारे बसविण्याला किडणीप्रत्यारोपण म्हणतात. कोणत्याही व्यक्तीच्या दोन किडण्यांमधील एक किडणी खराब झाली, तर शरीरातील किडणीशी संबंधित सर्व जरुरी कामे दुसऱ्या किडणीच्या मदतीने होऊ शकतात. तसेच ॲक्यूट किडणी फेल्युअरमध्ये योग्य उपचारांनी- औषधे आणि काही रोग्यांच्या बाबतीत थोड्या काळासाठी केलेल्या डायलीसीसने किडणी पुन्हा पूर्णपणे काम करू लागते. अशा रोग्यांना किडणी प्रत्यारोपणाची गरज भासत नाही. क्रॉनिक किडणी फेल्युर झालेल्या रोग्यांच्या दोन्ही किडण्या जेव्हा ८५ टक्क्यांहून जास्त खराब होतात, औषधे घेऊनदेखील रोग्यांची तब्येत सुधारत नाही आणि त्याला नियमित डायलिसीसची गरज भासते, अशा रोग्यांसाठी किडणी प्रत्यारोपण हा उपचाराचा दुसरा पर्याय ठरू शकतो. क्रॉनिक किडणी फेल्युअरच्या रोग्यांच्या जेव्हा दोन्ही किडन्या पूर्णपणे खराब होतात तेव्हा, त्यांना चांगले ठेवण्यासाठी आठवड्यात तीन वेळा नियमित डायलिसीस आणि औषधे घेण्याची गरज असते. अशा प्रकारच्या रोग्यांची प्रकृती ठरलेल्या दिवशी आणि ठरलेल्या वेळी केल्या जाणाऱ्या डायलिसीसवर अवलंबून असते. किडनी प्रत्यारोपण हा उत्तम रीतीने जगण्याचा एकमेव संपूर्ण आणि परिणामकारक उपाय आहे. यशस्वी किडणी प्रत्यारोपणाचे फायदे- १) रोगी इतर सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे आयुष्य जगू शकतो आणि आपली रोजची कामेदेखील करू शकतो. २) डायलिसीस करण्याच्या कटकटीतून रोगी मुक्त होतो. ३) खाण्यातले पथ्य कमी होते. ४) रोगी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त राहतो. ५) पुरुषांना शारीरिक संबंध ठेवण्यात कोणतीही अडचण येत नाही आणि महिला रोगी मुलांना जन्मही देऊ शकतात. ६) सुरुवातीच्या पहिल्या वर्षीच्या उपचारांच्या खर्चानंतर पुढील उपचार कमी खर्चात होतात. तर किडणी प्रत्यारोपणाचे तोटे- १) मोठ्या ऑपरेशनची गरज असते, पण ते पूर्ण सुरक्षित असते. २) सुरुवातीला यश मिळाल्यानंतरही काही रोग्यांत नंतर किडणी पुन्हा खराब होण्याची शक्यता असते. ३) किडणी प्रत्यारोपणानंतर नियमित औषधे घेण्याची गरज असते. ४) सुरुवातीची औषधे खूप महागडी असतात. जर औषधे घेणे थोड्या काळासाठी बंद झाले, तर प्रत्यारोपित किडणी निकामी होऊ शकते. ५) हे उपचार खूप महागडे असतात.

ऑपरेशन आणि हॉस्पिटलचा खर्च, घरी गेल्यानंतर नियमित औषधे तसेच वारंवार प्रयोगशाळेतील तपासण्या करणे यांचा खर्च खूप- तीन ते पाच लाख रुपयापर्यंत होतो. किडणी प्रत्यारोपण न करण्याचा सल्ला या वेळी दिला जातो- रुग्णाचे वय जास्त असणे, रोगी एड्स किंवा कॅन्सरने पिडीत असणे अशा स्थितीत किडणी प्रत्यारोपण जरुरी असूनही ते केले जात नाही. भारतात मुलांमध्ये किडणी प्रत्यारोपण खूप कमी होताना दिसून येतात. किडणी प्रत्यारोपणासाठी दाट असा निवडला जातो- क्रॉनिक किडणी फेल्युअरच्या रोग्यासाठी कुठल्याही व्यक्तीची किडणी उपयोगी पडेल असे नसते. सगळ्यात प्रथम ज्याला किडनीची गरज आहे, त्या रोग्याचा रक्तगट लक्षात घेऊन डॉक्टर हे निश्चित करतात, कि कुठली व्यक्ती त्याला किडणी देऊ शकेल. किडणी देणारा आणि घेणारा यांचे रक्तगट जुळण्याबरोबरच दोघांच्या रक्तातील पांढऱ्या रक्तपेशींमधील एचएलएचे प्रमाणही जुळावे लागते. एचएलएचे जुळणे हे तीसहू टायपिंग नावाच्या तपासणीने पहिले जाते. किडणी कोण देऊ शकतो? तर, सर्वसाधारणपणे १८ ते ५५ वर्षे वयोगटातील दात्याची किडणी घेता येते. स्त्री आणि पुरुष दोघेही एकमेकांना किडणी देऊ शकतात. जुळे भाऊ-बहिण हे आदर्श किडणीदाते मानले जाता. पण असे सहजासहजी आढळून येत नाही. आई-वडील, भाऊ-बहिण सर्वसाधारणपणे किडणी दान करण्यासाठी निवडले जातात. जर या किडणी दात्यांकडून किडणी मिळू शकली नाही, तर इतर कुटुंबीय जसे, काका, मामा, आत्या, मावशी यांचीही किडणी घेता येते. जर हेही शक्य नसेल, तर पती-पत्नींने एकमेकांच्या किडणीची तपासणी केली पाहिजे. कुटुंबातल्या व्यक्तीची किडणी मिळाली नाही, तर ब्रेन डेड- मेंदू मृत झालेल्या व्यक्तीच्या किडणीचे- कॅंडेव्हर किडणीचे प्रत्यारोपण केले जाते. किडणी दान करण्यापूर्वी किडणीदात्याची संपूर्ण शारीरिक तपासणी केली जाते. दात्याच्या किडण्या योग्यरीतीने कार्यरत आहेत कि नाही आणि त्याला एक किडणी दान केल्यानंतर काही त्रास तर होणार नाहीना, हे पूर्णपणे पडताळून पहिले जाते. साधारणपणे एक किडणी दिल्यानंतर दात्याला कोणताही त्रास होत नाही. तो आपले जीवन पूर्वीप्रमाणेच व्यतीत करू शकतो. ऑपरेशननंतर पूर्ण आराम केल्यानंतर तो शारीरिक श्रमदेखील करू शकतो. त्याच्या वैवाहिक जीवनातही कोणत्याही अडचणी येत नाहीत. दात्याने एक किडणी दिल्यानंतर त्याची दुसरी किडणी दोन्ही किडण्यांचे कार्य सांभाळू लागते. किडणी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णतपासणीः किडणी प्रत्यारोपणाच्या ऑपरेशनपूर्वी रुग्णाची अनेक प्रकारे तपासणी केली जाते. ऑपरेशनदरम्यान कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी रुग्णाचे शरीर ऑपरेशनसाठी अनुकूल आहे किंवा नाही या हेतूने या तपासण्या करण्यात येतात. त्यात शारीरिक चिकित्सा, लॅबोरेटरी तसेच रेडीओ लॉजिकल तपास केला जातो. किडणी प्रत्यारोपणचे ऑपरेशनः किडणी प्रत्यारोपणाच्या ऑपरेशनमध्ये काय केले जाते? तर रक्तगट जुळल्यानंतर, एचएलएचे प्रमाण योग्य कि नाही हे




निश्चित केल्यानंतर किडणी प्रत्यारोपनाचे ऑपरेशन केले जाते. ऑपरेशनपूर्वी रुग्णाचे नातेवाईक आणि किडणीदात्याचे नातेवाईक यांची संमती घेतली जाते. किडणी प्रत्यारोपणाचे ऑपरेशन डॉक्टरांची एक तज्ज्ञ टीम करते. नेफ्रॉलॉजीस्ट- किडणी फिजिशियन, युरोलॉजिस्ट- किडनीचे सर्जन, पॅथॉलॉजिस्ट आणि इतर प्रशिक्षित सहायकांच्या संयुक्त कामगिरीने हे ऑपरेशन होते. हे ऑपरेशन युरोलॉजिस्ट करतो. किडणीदाता तसेच एक किडणी मिळणारा रुग्ण या दोघांचे ऑपरेशन एकाच वेळी केले जाते. किडणीदात्याची एक किडणी ऑपरेशन करून काढल्यानंतर ती विशेष प्रकारच्या थंड द्रवात पूर्णपणे स्वच्छ केली जाते. त्यानंतर ही किडणी क्रॉनिक किडणी फेल्युअरच्या रुग्णाच्या पोटाच्या पुढील भागात उजव्या खालच्या बाजूला प्रत्यारोपित केली जाते. सर्वसाधारणपणे रुग्णाची खराब किडणी काढली जात नाही. मात्र, ती शरीराला हानी पोहोचवत असेल, तर अशा अपवादात्मक बाबतीत ती किडणी काढणे गरजेचे ठरते. हे ऑपरेशन साधारणपणे तीन-चार तास चालते. ऑपरेशन पूर्ण झाल्यानंतर किडणी प्रत्यारोपण केलेल्या रुग्णाच्या पुढील सर्व उपचारांची जबाबदारी नेफ्रॉलॉजिस्ट सांभाळतो. किडणी प्रत्यारोपणापुर्वी जाणून घ्यायच्या सूचना- संभावित धोकाः किडणी प्रत्यारोपणानंतरच्या संभावित धोक्यांमध्ये, शरीराने नवी किडणी न स्वीकारणे- किडणी रिजेक्शन, संसर्ग होणे, ऑपरेशनसंबंधी धोक्यांबाबत भीती वाटणे आणि औषधांचा दुष्परिणाम होणे यांचा समावेश आहे.

औषधाद्वारे उपचार आणि किडणी नाकारणे- रिजेक्शन, किडणी प्रत्यारोपण इतर ऑपरेशन्सपेक्षा कशा प्रकारे वेगळे असते? तर सामान्यपणे इतर ऑपरेशननंतर रोग्याला फक्त सात ते दहा दिवसांपर्यंत नेमून दिलेली औषधे घ्यावे लागतात. परंतु किडणी प्रत्यारोपणाच्या ऑपरेशननंतर किडणी अस्वीकार थांबवण्यासाठी जन्मभर औषधे घ्यावीच लागतात. किडणी नाकारणे म्हणजे काय? तर रुग्णाच्या रक्तातील पांढऱ्या रक्तपेशीमध्ये रोगप्रतिकारक पदार्थ अँटीबॉडीज तयार होतात. या अँटीबॉडीज जीवाणूंशी लढा देऊन त्यांना नष्ट करतात. याचप्रकारे प्रत्यारोपित केलेली किडणी शरीराबाहेरील- परकी असल्यामुळे, शरीरातील पांढऱ्या रक्तपेशीत तयार झालेल्या अँटीबॉडीज प्रत्यारोपित किडणीचे नुकसान करू शकतात. या नुकसानीच्या प्रमाणानुसार नवी किडणी खराब होते. यालाच वैद्यकिय भाषेत किडणी रिजेक्शन म्हणजेच किडणी नाकारणे म्हणतात. किडणी प्रत्यारोपणानंतर रिजेक्शनची शक्यता कमी करण्यासाठी उपयोगी औषधे- शरीराच्या प्रतीकारशक्तीमुळे प्रत्यारोपित किडणी अस्वीकृत होण्याची शक्यता असते. जर औषधांनी शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी केली, तर अस्वीकृतीची भीती राहत नाही. पण रोग्याला जीवघेणा जंतुसंसर्ग होण्याची भीती असते. किडणी प्रत्यारोपनानंतर विशिष्ट प्रकारची औषधे दिली जातात. जी किडणी अस्वीकृती थांबवण्याचे मुख्य काम करते आणि रोग्याची रोगांशी लढण्याची ताकद कायम ठेवते, अशा प्रकारच्या औषधांना इम्युनो सप्रेसंट म्हटले जाते. प्रेडनीसोलोन, एजाथायोप्रिन, सायक्लोस्पोरीन, ट्राकोलीमस आणि एमएमएफ ही अशी मुख्य औषधे आहेत. किडणी प्रत्यारोपणानंतर इम्युनो सप्रेसंट औषधे किती काळ घ्यावी? तर ही खूप महागडी औषधे प्रत्यारोपणानंतर रोग्याला जन्मभर घ्यावी लागतात. सुरुवातीला औषधाचे प्रमाण जास्त वाटते, पण ते हळूहळू कमी होत जाते. किडणी प्रत्यारोपनानंतर आणखी काही औषधे घेण्याची गरज असते का? तर होय, किडणी प्रत्यारोपण केल्यानंतर गरजेनुसार रोग्याला उच्च रक्तदाबावरील औषधे, कॅल्शीअम, जीवनसत्व आदि औषधे घ्यावी लागतात. जर इतर कुठल्याही आजारामुळे औषध घेण्याची गरज पडली. तर, नव्या डॉक्टरला औषध घेण्यापूर्वी रोग्याचे किडणी प्रत्यारोपण झाले आहे, हे सांगावे लागते. तसेच सध्या तो कोणती औषधे घेत आहे हे सांगणे गरजेचे आहे. किडणी प्रत्यारोपणानंतरच्या आवश्यक सूचना- नव्या किडणीच्या देखभालीसाठी महत्वपूर्ण सूचना किडणी प्रत्यारोपित केलेल्या रोग्यासाठी महत्वपूर्ण आहेत. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नियमित औषधे घेणे अत्यंत गरजेचे आहे. जर औषधे नियमित घेतली नाहीत. तर नवी किडणी खराब होण्याचा धोका असतो. सुरुवातीला रोग्याचा रक्तदाब, लघवीचे प्रमाण आणि वजन नियमितपणे मोजून त्याची नोंद करणे गरजेचे असते. रक्त व लघवीची तपासणी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नियमितपणे लॅबोरेटरीत जाऊन केली पाहिजे व नियमितपणे नेफ्रोलॉजिस्टकडे तपासणी करून घेतली पाहिजे. रक्त व लघवीचा तपास हा विश्वासपात्र लॅंबोरेटरीतूनच करणे जरुरीचे असते. रिपोर्टमध्ये जर मोठे बदल दिसून आले, तर लॅब बदलण्याऐवजी नेफ्रोलॉजिस्टला त्वरित कळवले पाहिजे. ताप येणे, पोट दुखणे, कमी लघवी होणे, अचानक वजन वाढणे किंवा इतर काही त्रास होत असेल, तर नेफ्रोलॉजिस्टशी त्वरित संपर्क साधने अत्यावश्यक आहे. किडणी प्रत्यारोपणानंतर जंतूसंसर्गापासून वाचवण्यासाठी सुरुवातीला संसर्ग होऊ नये म्हणून स्वच्छ, जीवाणूरहित मास्क घालणे गरजेचे आहे. जो रोज बदलला पाहिजे. रोज स्वच्छ पाण्याने अंघोळ केल्यानंतर उन्हात वाळवलेले आणि इस्त्री केलेले कपडे वापरले पाहिजेत. घर पूर्णपणे स्वच्छ ठेवले पाहिजे. आजारी व्यक्तीजवळ जाता कामा नये. प्रदूषित, गर्दीच्या ठिकाणी म्हणजे जत्रेत वगैरे जाणे टाळले पाहिजे. पाणी नेहमी उकळलेले, थंड करून गाळून प्यायले पाहिजे. बाहेरचे पदार्थ खाऊ नयेत. घरात ताजे बनवलेले जेवण स्वच्छ भांड्यात घेऊनच खावे. खाण्यापिण्यासंबंधी सर्व सूचनांचे पूर्णपणे पालन करावे.

# पोळ्याचा दिवस...!

आधुनिक केसरी

**पोळ्याचा दिवस उजाडला की, गावातल्या पोळ्याचं चित्रण जणू माह्या डोळ्यासोर दिसायला लागते. माह्य मन भूतकाळाच्या आठवणीत रंगून जाते व गावाकडचा "बालपणीचा पोळा"मले आठवायला सुरवात होते. पोळ्याच्या दिशी म्हाया गावात वेगळीच मजा असायची.गावातली समदी माणसं या दिसाची आतुरतेन वाटच बघत बसायचे कारण वरीस भर रानात राब राब राबणाऱ्या "बैलाचा ह्यो सोहळा "असायचा.अन त्यातल्या त्यात मी तर लयच आनंदी व्हायचो.त्याच असं की समद्या सणात "पोळा" हा माह्या आवडता सण. पोळ्याचा आदला दिस म्हणजे "खानमळनाचा दिवस". या दिशी लोकांची गडबड सुरु असायची. काळ्या मातीत सालभर घाम गाळनाऱ्या बळीराजाचा ह्यो आनंदाचा उत्सव. गावातली माणसं आपापली बैल वावरात नेऊन मनसोक्तपणे चारायचे. अन संध्याकाळी तर लयच थाट असायचा.**

पहयले पळसाच्या पाच पानांचे देठव् हळद अन दुधाच्या पाण्यात बुडवून त्याने बैलाचा खांदा मळल्यानंतर नारळ फोडून बैलांची पुजापाती व्हायची. "आज आवतन घ्या,उद्या जेवायला या हो..."म्हणत कसाट्यांचाआवाज कानी घुमत असे. पोळ्याचा दिवस उजाडला की,समदीकड आनंदाच वातावरण पसरायचं. शाळेजवळ आखरापाशी गाणे वाजत असत.समदी मानस आपापली बैल नदीवर धुण्यासाठी न्यायचे. मोठ्या हौसेने लक्स अन निरमा पावडरने धुवायचे. बैलास्नी तलावात पोव्हाडायचे. चिल्या-पाल्या पोराना तर नदीत पोहायचा चानसच भेटत असे. दुपारपर्यंत समदे लोकं आप-आपले बैलं गावात आणायचे मग त्यायले सजवायले सुरुवात व्हायची. गोंडे,घंटा, रंगीबेरंगी फुलांचा हार,शिंगांना हिरवा,पिवळा रंगाचा हिंगोळ लावल्या जायचा. अंगावर लाल,गुलाबी,हिरव्या रंगाचे ठिपके व पाठीवर झूल टाकली जाते असे.दोन्ही शिंगाच्या मध्ये फुगा लावला जायचा. शेवटी “काय बाकी रायल तर नाही ना!” या शंकेने म्हातारी वयस्क मानस बैलाकड निरखून बघायचे.त्यानंतर बैलास्नी घरी निवद लाऊन वाजत गाजत लोकं बैलं आखरापाशी आणून समद्या बैलास्नी एका रांगेत उभे केले जात असे.सगळीकडं रंगी बेरंगी सजवलेली बैलं जणू नव्या नवरदेवासारखी दिसू लागायची. हळूच गाण्याचा आवाज सुद्धा कानावर पडायचा. सारं वातावरण प्रसन्न असायचं. चिले-पाले पोरं गाण्याचा तालावर मस्त आंग हालवायचे. जणू ती एक प्रकारची जत्राच दिसू लागत असे. मग मंगल आष्टका सुरु झाल्यावर समदी माणसं आपापल्या बैलावर आक्षदा फेकायचे शेवटच्या कडव्यात सामद्यांची चुळबूळ सुरु व्हायची. एका हातात पुराणी व एका हातात कासारा घेऊन सगळे सज्ज होत असे.सगळ्याची गडबड सुरू व्हायची कारण जो कोणी अगोदर मारोतीच्या मंदिराजोळ पोहचेल त्याचा पहिला नंबर येत असे.शेवटच कडव झाल्यावर "शुभमंगल सावधान...!" झालं रे झालं की, मोठ्याने फटाक्याचा आवाज यायचा. ढोल-ताशे वाजले लागायचे. डफडयाचा देखील आवाज घुमायला लागत असे. तशीच समदी माणस बैलास्नी घेऊन धावत सुटायचे. कुणाला कुणाचे भान नसायचे. बैल सैरा वैरा धावत असतांना घुंगराचा आवाज घुमायचा.जिकडे तिकडे पळापळ सुरु व्हायची. मारोतीच्या मंदिराजवळ कोण अगोदर पोहचेल या साठी पळापळ असायची. धई-धई म्हणत माणसं बैलास्नी पळवत सुटायचे. खऱ्या अर्थाने “पोळा म्हणजे बैलांचा सोहळा”पार पडायचा व आम्ही आनंदाच्या भरात घराकडे परत यायचो.....

आर.आर. पठाण
मो.९८२२३४८९७०



# हिंदी भाषा ही देशाचा आधारस्तंभ



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**हिंदी भाषा ही देशाचा "आधारस्तंभ" आहे. त्यामुळे सर्वच प्रकारच्या शिक्षणामध्ये हिंदीला सक्तीची भाषा केलीच पाहिजे. देशात आनंदाची गोष्ट म्हणजे 2014 पासुन हिंदी भाषेचा प्रसार भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोठ्या प्रमाणात होत आहे. युनो सारख्या मोठ्या मंचावर दीवंगत नेता अटल बिहारी वाजपेयी, सुष्मा स्वराज यांनी हिंदी भाषेत आपले विचार मांडुन देशाचा गौरव उंचावला आणि मोदी पंतप्रधान झाले तेव्हा पासुन संपूर्ण भारतात व जगात हिंदी भाषेचा प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे हि भारताच्या दृष्टीने अत्यंत आनंदाची आणि कौतुकास्पद बाब आहे याचं मी मनापासून स्वागत करतो.भारताची राष्ट्रभाषा हींदी आहे.**

तीला कुठेही तडा जाणार नाही याची जबाबदारी संपुर्ण भारतवासीयांची आहे. देशातील कोणताही व्यक्ती असो त्याला हिंदी भाषेचेज्ञान असायलाच पाहिजे. कारण हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून ओळखल्या जाते. हिंदी भाषा व प्रादेशिक भाषा या प्रत्येकाला येणे व समजने अती आवश्यक आहे. परंतु आताही भारतातील काही दीग्गज नेतागन व सिलेब्रेटी विदेशी दौऱ्यावर जातात तेव्हा इंग्रजीला खुपच महत्त्व देताना दिसतात हे योग्य नाही. परंतु पर्यायी भाषा म्हणून इंग्रजीचा वापर व्हावयास पाहिजे. भारतीय भाषा बऱ्याच आहेत त्या समृध्दीही आहेत. पण दक्षिणेतील भाषा समजायला कठीण जातात. हिंदी भाषा मात्र सर्वानाच लवकर समजते व अवगत होते. सर्वच धर्माच्या लोकांना हिंदी भाषेची जान आहे.फक्त दक्षिण भारतातील काही राजकीय पुढारी हिंदी भाषेचा विरोध करतांना दिसतात. ते विदेशी इंग्रजी भाषा बोलायला तयार आहेत. परंतु हिंदी भाषा बोलायला किंवा ऐकायला तयार नाहीत, हे कीतपत योग्य म्हणावे ? भारतात अनेक धर्म, अनेक भाषा, अनेक पंथ, अनेक जाती आहेत. परंतु कोणीच आता पर्यंत हिंदीचा विरोध केलेला नाही. फक्त दक्षिणमध्येच हिंदीचा विरोध होतो. तामिळनाडुत करुणानिधी यांनी 1965 मध्ये हिंदी भाषेचाकडाडून विरोध केला होता व त्यावेळेस राज्यात हिंदी विरूद्ध आंदोलन उभारण्यात करूनानिधींचा मोठा वाटा होता. या आंदोलनाला हिंसक वळणसुध्दा लागले होते. शेवटी तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी देशात "त्रिभाषा सूत्र"सुरूच राहील असे स्पष्ट केले होते व आंदोलन थांबले. हिंदी भाषेचा त्रास ज्यांना आहे त्यांनी आपल्या प्रादेशिक भाषेचा वापर अवश्य करायला हवा. आपण सर्व हिंदुस्थानात रहातो मग सर्वानाच हिंदी भाषा का येऊ नये ? आपण संपूर्ण देशात इंग्रजीभाषा सक्तीची करू शकतो मग हिंदी का नाही? भाषावाद पहाता 2014 मध्ये केंद्रीय गृहमंत्र्यानी निर्णय घेतला की केंद्र सरकारमधील सर्व अधिकृत सोशल मीडिया अकाउंट्सवर प्रामुख्याने हिंदीतून ट्विट करण्यात यावे आणि इंग्रजी ही ऐच्छिक भाषा असेल असे जाहीर केले होते. कारण सर्वानाच हिंदी भाषा अवगत आहे भारतात 28 राज्य व 8 केंद्रशासीत प्रदेश आहेत त्यात जर एकट्या तामिळनाडू सारख्या राज्याचा हिंदी भाषेला आताही विरोध असेल तर ते योग्य नाही. आपली मूळात इंग्रजी भाषा नाहीच मग इतका इंग्रजीचा उहापोह कशाला? देशाची राष्ट्रभाषा हिंदी आहे.

मग सर्वच राज्यात हिंदी हा विषय अनिवार्य का नाही? मी सरकारला आवर्जुन सांगेल की, आपली मातृभाषा (प्रादेशिक भाषा). आपली राष्ट्रभाषा व नंतर इंग्रजी भाषा सर्वच राज्यांत सक्तीची करावी. जो राजकीय नेता राष्ट्रभाषेचा विरोध करेल त्याला दंडीत केलेच पाहिजे. कारण राष्ट्रभाषेचा विरोध करने म्हणजे राष्ट्राचा अपमान करने होय असे मी समजतो. तामिळनाडुमधील अनेक लोक इतर राज्यात नौकरी किंवा व्यवसाय करीत आहेत त्यांना हिंदीची जान आहे मग तामिळनाडूच्या नेत्यांना हिंदीचा विरोध का? संपूर्ण देशाने हिंदी भाषेची जोपासना करावी त्याच सोबत संपूर्ण राजकीय पक्षांनी हिंदी भाषेचा वापर सर्वात जास्त करावा. संपूर्ण सरकारी कामे प्रादेशिक भाषेत किंवा हिंदीतुनच व्हावयास पाहिजे. 2014 मध्ये नरेंद्र मोदी प्रधानमंत्री होताच करुनानिधी, जयललिता, वायको, उमर अब्दुल्ला यांनी हिंदी भाषेला विरोध केला होता. त्याचबरोबर 2014 मध्ये जम्मु काश्मिरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला म्हनाले होते की, भारतासारखा खंडप्राय देशात अनेक भाषा आणि बोली बोलल्या जातात या देशातील धार्मिक आणि भाषिक संस्कृती वेगवेगळ्या प्रकारची आहे अशा परीस्थितीत हिंदीचा अट्टाहास धरता येणार नाही असे त्यांनी त्यावेळेस म्हटले होते.भारतात अधिकृत 22 भाषा असल्या तरी भारतात 500 हुन अधिक महत्वपूर्ण भाषा आहेत.




मग हिंदीला राष्ट्र भाषेचा दर्जा दीलेला आहे त्याचे काय ? आपण स्वातंत्र्यात जगत आहोत त्यामुळे इंग्रजीचा जास्त लाड करने योग्य नाही.आजही प्रत्येक देशाला आपआपल्या राष्ट्रीय भाषेचा अभिमान आहे.त्याचप्रमाणे आपल्याला सुध्दा राष्ट्रभाषेचा अभिमान असायला हवा.परंतु आजही भारतात इंग्रजीला अधिक जवळ करतात हे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.ही बाब सत्य आहे की, 2014 पासुन संपूर्ण भारत हिंदी भाषामय झालेला आहे यात तिळमात्र शंका नाही. 2014 पासून आजपर्यंत संपूर्ण जगभर हिंदीचा प्रसार सुध्दा होत आहे ही भारताकरीता स्वाभिमानाची आणि गौरवास्पद बाब आहे. परंतु आताही भारतात काही हिंदी विरोधी आहेत त्यांना हिंदीचा पाठपढविने अत्यंत गरजेच आहे. देशात असेही प्रधानमंत्री होवुन गेले की त्यांनी हिंदीचा वापर नाहीच्या बरोबरीने केलेला आहे. त्याचप्रमाणे आताही अनेक सांसद हिंदी किंवा मातृभाषेचा वापर न करता संसदेत आपले विचार इंग्रजीत मांडतात.याकडे सुध्दा लक्ष वेधले पाहिजे.

मनुष्य प्राणी हा बुध्दीजीवी आहे. त्याला सर्वच गोष्टींचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे जगात प्रत्येक देशाच्या वेगवेगळ्या भाषा आहेत. त्याही शिकायल हरकत नाही यांनी ज्ञान वाढते. परंतु मातृभाष आणि राष्ट्रभाषेला विसरता कामा नये ही बाब सर्वानीच लक्षात ठेवले पाहिजे. माझ्या माहीतीनुसार जगात इतक्या भाषा नसतील तीतक्या भाषा भारतात आहे त्या शिकाव्यात. परंतु मातृभाषेचा व राष्ट्रभाषेचा विसर पडणार नाही याचीही काळजी व जबाबदारी सर्वांनीच घ्यावी.जगात भारत असा देश आहे की या ठिकाणी देव-दानव, साधु-संत, थोर महात्मे, थोर पुरुष,राजे-महाराजे,क्रांतीकारी,थोरविचारवंत इत्यादींच्या मंथनातून हा देश घडलेला आहे. त्यामुळे जगातील प्रत्येक देशाच्या व्यक्तीला भारतीय संस्कृती भारावते आणि त्याचा आनंद सुध्दा घेतात. त्यामुळेच आपल्या पुर्वजांनी हिंदी भाषा सरळ,सोपी व लवचिक बनवीली जेनेकरून ती सर्वान समजायला सोपी जाईल. हिंदी या शब्दात बरंच काही लपलेलं आहे.हिंदी पासुन हिंदुस्थानात, हिंदव स्वराज्य, जय हिंद, आझाद हिंद सेना असे अनेक महत्त्वपूर्ण उर्जा देणारे आणि क्रांतिकारी शब्दाशी हिंदीशी निगडित असुन जवळचे नाते आहे. ते सर्वानीच जपले पाहिजे, भारताला हिंदी व मातृभाषा ही आपल्या पुर्वजांनी दिलेली संजीवनी आहे.कारण यातुनच देवान-घेवान व संस्कृतीचे जतन होत असते.जय हिंद!

# पैठणमध्ये प्रारब्ध फाऊंडेशनची दहीहंडी रसिकांच्या उपस्थितीत साजरी




आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** प्रारब्ध फाऊन्डेशन व भाग्य कन्स्ट्रक्शनची दहीहंडी उत्साहात साजरी करण्यात आली. एकावर एक मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकातील चढाओढ, ठेका धरायला लावणारा संगीताचा ठेका, सोबतीला अकर्षक रोषणाई चा सहवास आणि क्षणाक्षणाला वाढणारी उत्कंठा अशा जल्लोषी वातावरणात तब्बल तीन तास प्रारब्ध च्या दहीहंडीचा थरार रंगला. पाचमानवी मनोरे आणि त्यावर डबल एक्काचा (एकावर एक गोविंदा) अशा पध्दतीने रचना करत बिडकीनच्या मोरया गोविंद पथकाने दहीहंडी फोडली अन् २२ हजार रुपयांचे बक्षीस जिंकले. छत्रपती शिवाजी महाराज परिसरातील राजपुत्र भवन पटागंनात गुरुवारी रात्री पैठणमधे दहीहंडीचा थरार अनुभवण्यासाठी हजारोंच्या संख्येने गर्दी लोटली होती. डीजेचा ठेका आणि गोविंदा रे गोपाळाच्या तालावर हास्यजत्रा फेम रसिकाच्या उपस्थितीत तरुणाई थिरकली. हजारो पैठणकर रसिकांनी लुटला या उत्सवाचा मनमुराद आनंद. चेअरमन विलासबापू भुमरे यांच्या उपस्थितीत आयोजक प्रारब्धचे अध्यक्ष शिवराज पारीख व भाग्य कन्स्ट्रक्शनचे शिवा भाग्यवंत यांनी दहिहंडीचे आयोजन केले होते. माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, सोमनाथ परदेशी, राष्ट्रवादीचे जितू परदेशी, शेखर शिंदे, सचिन उंडाळे यांच्यासह मान्यवरांनी लावली प्रमुख उपस्थिती. दहीहंडी स्पर्धेत सहभागी गोविंदा पथकांनी चार थरांची सलामी दिल्यानंतर सायंकाळी आठ वाजण्याच्या सुमारास प्रत्यक्ष स्पर्धेला सुरुवात झाली. यावेळी सात गोविंदा पथकांनी या फेरीत सहभाग नोंदवत चार थर रचले. मात्र दहीहंडी फोडण्यात ते अपयशी ठरले. सहभागी संघांमध्ये दहीहंडी फोडण्यासाठी पुन्हा एकदा कमालीची चढाओढ पाहावयास मिळाली. यामध्ये बिडकीनच्या मोरया युवा मंच मंडळाने जिगरबाज वृत्तीचे दर्शन घडवित काही मिनिटातच सहा थर रचले. वरच्या थरावरील गोविंदाने दहीहंडी फोडताच मैदानात एकच जल्लोष सुरू झाला. त्यांना हास्यजत्रा फेम रसिका वेगुर्लेकरच्या हस्ते ट्रॉफी व बक्षीस वितरण करण्यात आले.दहीहंडी उत्सव यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी प्रारब्ध फाऊन्डेशन चेउपाध्यक्ष महेश लोळगे, सचिव यश राजपूत, कोषाध्यक्ष पवन बचाटे, स्वागताध्यक्ष प्रसाद सेवनकर, सदस्य निलेश टाक, सिध्दार्थ परदेशी, अमित करडवाल, योगेश कुंडारे, संदेश मुथा, प्रितेश घोडके, अनुप मालपाणी, विजय जाधव,योगेश जोजारे, कपिल कावसानकर, शंकर वाजे, राम सव्वाशे, कृष्णा तावरे, दादा डांगरे, ऋषी तांबटकर,संदिप पोकळे यांनी परिश्रम घेतले.

# बैल धुण्यासाठी गेलेल्या तरुणाचा बुडुन मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** बुधवारी पोळा सणाच्या निमित्ताने बैल



धुण्यासाठी गेलेल्या नवतरुणाचा पाण्यात बुडुन मृत्यू झाला आहे. रांजणगाव खुरी येथील गावाजवळीक नदीत दुपारच्या सत्रात येथील तरुण अरुण भागचंद ईनामे, वय 25 वर्ष यांचा नदीत बुडुन मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. रांजणगाव खुरी येथील दर्गा रोडवरील नदीवर पोळा सणानिमित्त बैल धुण्यासाठी गेला असता नदीत बुडाला तर बाहेरच आला नसल्याने गावातील नवनाथ इनामे व तरुणांनी नदीबाहेर काढत ग्रामीण रुग्णालय बिडकिन येथे हलविण्यात आले असता वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून मयत घोषीत केले असुन शवविच्छेदन करण्यात आले. तसेच अंत्यविधीसाठी नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पोळा सणानिमित्त घटनेने हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिस ठाणे येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# धुळे जिल्हा पोलीसांनी गुन्ह्यातील जप्त एक कोटीचा मुद्देमाल केला हस्तांतरित

## तक्रारदार यांनी मानले धुळे पोलिसांचे मनापासून आभार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात पोलीस कवायत मैदान धुळे येथे धुळे जिल्हा पोलीस दलाच्या वतीने मुद्देमाल हस्तांतरण सोहळा आयोजीत करण्यात आला होता. दाखल दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, चोरी या सारख्या विविध गुन्हयातील तक्रारदारांचे गेलेले सोन्या-चांदीचे दागीने रोख रक्कम दुचाकी चार चाकी, टॅक्टर, ट्रॉली, शेती उपयोगी औवजारे, इत्यादीचा स्थानिक गुन्हे शाखा व स्थानिक पोलीस स्टेशन यांनी गुन्हयाचा कसोशीने तपास करुन गुन्हे उघडकीस आणले व गुन्हयातील आरोपीतांकडुन चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. धुळे जिल्हा पोलीस दलाच्या वतीने मा.डॉ. बी.जी. शेखर पाटील, विशेष पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र नाशिक व मा. संजय बारकुंड, पोलीस अधीक्षक धुळे यांच्या संकल्पनेतुन सदरचा मुद्देमाल तक्रारदार यांना



तात्काळ परत करण्यासाठी पोलीस दलाने स्वतः हुन पुढाकार घेऊन मा.न्यायालयात पाठपुरावा केला व तक्रारदार यांना मुद्देमाल परत देणेबाबतचे आदेश प्राप्त करुन घेतले. सदर सोहळयात तक्रारदार यांना डॉ. बी.जी. शेखर पाटील, विशेष पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र नाशिक यांच्या हस्ते सुमारे १ कोटी ९२ हजार ६२२ रुपयाचा मुद्देमाल (सोन्या-चांदीचे दागीने, रोख रक्कम, दुचाकी, चार चाकी, टॅक्टर, ट्रॉली, शेती उपयोगी औवजारे, इत्यादींचा) परत करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमावेळी तक्रारदार यांनी धुळे जिल्हा पोलीस दलाप्रती कृतज्ञता व्यक्त करून मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमांचे सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले. तसेच प्रास्ताविक मा. श्री. किशोर काळे, अपर पोलीस अधिक्षक धुळे यांनी केले. संजय बारकुंड पोलीस अधिक्षक धुळे, बी.जी. शेखर पाटील, विशेष पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र नाशिक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वाहीद अली सैय्यद यांनी केले. हेमंत पाटील पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा धुळे यांनी आभार प्रदर्शन करुन कार्यक्रमाची सांगता झाली..

सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक, धुळे व अपर पोलीस अधीक्षक, धुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा शाखा, धुळे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी, पोलीस मुख्यालय, धुळे येथील राखीव पोलीस निरीक्षक व अंमलदार, तसेच ट्रायल मॉनिटरींग सेलचे पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व मुद्देमाल कारकून अशांनी मेहनत घेतली आहे.

# सकल धनगर समाजाचे तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** सकल धनगर समाज जिंतूरच्या वतीने तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले. सोलापूर येथे धनगर आरक्षण कृती समितीचे बंगाळे व त्यांचे सहकारी यांनी माननीय राधाकृष्ण विखे पाटील यांना लोकशाही मार्गाने निवेदन सादर करत असताना महाराष्ट्राचे देवत श्री खंडोबाराया यांचा पवित्र भंडारा बंगाळे यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अंगावर उधळला असता त्या ठिकाणी उपस्थित सुरक्षा रक्षक यांनी बांगले यांना मारहाण केली. या घटनेमुळे धनगर समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. तसेच धनगर समाजाची मुख्य मागणी गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबितआहे घटनेमधील 36 नंबरचे धनगर समाजाचे एसटी आरक्षण त्वरित राज्य सरकारने केंद्र सरकारला सांगून येत्या विशेष अधिवेशनापूर्वी त्याची अंमलबजावणी करावी यासाठी आज तहसीलदार मार्फत निवेदन सादर केले. यावेळी प्रभाकर वजीरसर, कुबेराव हुलगुंडे, सुधाकर कुकडे, अनंतराव कोरडे, अर्जुन वजीर दिपक राव शेंद्रे, अशोक थिटे, भगवान गायकवाड, मनोहर सातपुते, वाल्मीक गडदे, रवी कुमार होडबे, अनिल शेंद्रे, रमेश थिटे, काशिनाथ घनवटे, शिवाजी पोले, सुधाकर हाके,नामदेव कष्टे, विठ्ठल चांदणे, रामप्रसाद देवकर, विक्रम वलेकर, रामेश्वर मुधवर, ज्ञानेश्वर आव्हाड, पांडुरंग कोरडे, साहेब बालासाहेब साखरे, संदीप शेळके, रामकिसन गडदे, भगवान गारोडी, राजेश्वर मोगरे, गजानन वऱ्हाड, बाळासाहेब कानडे, अर्जुन शिंपले सुरज साखरे ,पांडुरंग कोरडे, सुभाजी गरगडे, मधुकर लोहटे, रामराव शिंपले, माधव चांदणे, दिनकर सातपुते, नंदाबुवागिरी, थिटे प्रमोद, काळे शामराव, राजेश्वर मोगरे, सखाराम दुगाने, शंकर माने, शेषराव डफडे, भास्कर बनगर, शेषराव महाळनर, आदी धनगर समाजाचे जेष्ठ व युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोहम्मद हुसेन यांची राष्ट्रीय उर्दू शिक्षक पुरस्कारासाठी निवड

## गालिब अकॅडमी, नवी दिल्ली येथे होणार सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** भारतीय राष्ट्रीय उर्दू शिक्षक कर्मचारी संघाच्या वतीने



प्रदेशाध्यक्ष आबिद खान यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे राष्ट्रीय उर्दू शिक्षक पुरस्कार २०२३ जाहीर केला आहे. तिसरे राष्ट्रीय परिषदच्या निमित्ताने राष्ट्रीय उर्दू शिक्षक पुरस्कार अशा शिक्षकांना प्रदान करण्यात येणार आहे ज्यांनी या नवीन पिढीला शिक्षण देऊन त्यांना उच्च पदापर्यंत पोहोचविण्याचे काम केले, तसेच शासकीय योजना व उपक्रमातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या सन्मानासाठी देशातील २० पेक्षा अधिक राज्यातील शिक्षकांची निवड करण्यात आली असून या मध्ये जि.प. वरिष्ठ प्राथमिक शाळा, दही हांडा जिल्हा अकोला येथील सहाय्यक शिक्षक पदावर कार्यरत मोहम्मद हुसेन मोहम्मद आजम यांची त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल निवड करण्यात आली आहे. मोहम्मद हुसेन यांनी यापूर्वीही बुलढाणा जिल्ह्यात कार्यरत असताना शैक्षणिक क्षेत्रात उत्तम कामगिरी केली आहे. सदर पुरस्कार वितरण व सन्मान सोहळा २९ ऑक्टोबर २०२३ रोजी गालिब अकॅडमी, नवी दिल्ली येथे होणार आहे. यानिमित्ताने सर्व मित्र परिवार, अधिकारी पदाधिकारी, सहकारी शिक्षकांच्या वतीने मोहम्मद हुसेन यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात असून त्यांच्या परिवारामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# शिक्षकांच्या मागण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** १२ सप्टेंबर रोजी वंचित बहूजन आघाडी जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी किरण पाटील यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. त्यामध्ये निवृत्तधारक शिक्षकांच्या केलेल्या नियुक्त्या रद्द करण्यात याव्या,शिक्षकांचा अतिरिक्त कामाचा भार कमी करण्यात यावा.ह्या प्रमुख मागण्या आहेत. जर पवित्र पोर्टलच्या माध्यमातून जि प शाळांमध्ये शिक्षक घेतले तर डीएड आणि बीएड धारकांना एक रोजगाराची संधी प्राप्त होईल.तसेच शिक्षकांवरील अतिरिक्त कामाचा भार कमी झाल्यास शिक्षक हा विद्यार्थ्यांना प्रांजळपणे आणि गांभीर्याने शिकविण्याचे काम करू शकेल आणि विद्यार्थी गुणवत्ता दर्जा सुधारेल. जर शिक्षण विषयक वरिल मागण्या पूर्ण न झाल्यास वंचित बहुजन आघाडी जिल्ह्याच्या वतीने मा शिक्षणाधिकारी साहेब बुलढाणा येथे ठिय्या आंदोलन देखील केले जाईल असा इशारा यावेळी निवेदनाद्वारे देण्यात आला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजनेअंतर्गत ज्या विहिरीचे संपूर्ण काम झाले परंतु आद्यपदेखील त्या गरजूंना त्यांच्या विहिरीवर वीज जोडणी झाली नाही. या संदर्भात सुद्धा वंचित बहुजन आघाडीने जिल्हाधिकारी साहेबांना निवेदनाद्वारे अवगत केले. निवेदन देतेवेळी प्रशांत भाऊ वाघोदे, जिल्हा महासचिव. ऍड. अनिल भाऊ इखारे जि महासचिव वं ब आ बुलढाणा, दिलीप कोकाटे सर फुले आंबेडकर विद्वत सभा जि समन्वयक बुलढाणा, मिलिंद वानखडे बुलढाणा शहर अध्यक्ष, अनिल रणीत सर जि युवा उपाध्यक्ष, श्रीकृष्ण गवई सर ता उपाध्यक्ष ज जा, प्रवीण तायडे शहर अध्यक्ष ज जा, नवनीत सिरसाट जिल्हा नेते,जयकुमार डोंगरदिवे, गौतम तायडे, शेषराव उमाळे,मारोती अवचार आदी वंचित बहुजन आघाडी पदाधिकारी,कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सोयगाव तालुक्यात सरकारी कार्यालयांचा 'आरसा' आता सर्वांनाच होणार खुला

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व परिसरात सर्वसामान्य नागरिकांसाठी आवश्यक असलेली प्रत्येक सरकारी कार्यालयातील कामकाजाशी संबंधित माहिती वेबसाइटवर टाकावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने १७ ऑगस्ट रोजी दिले. या आदेशामुळे गेल्या १७ वर्षापासून असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांच्या छुप्या कारभाराला चाप लागणार आहे. तर दुसरीकडे नागरिकांनाही अशी माहिती मिळविण्यासाठी ऊठसूट आरटीआय टाकावा लागणार नाही.सर्व प्राधिकरणांनी "केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ४ (१) (ख) मधील तरतुदीनुसार आपल्या कार्यालयाच्या १७ बाबींची माहिती वेबसाइटवर टाकणे बंधनकारक आहे. त्यातून नागरिकांना त्या प्राधिकरणाबाबत संपूर्ण माहिती मिळेल."याच बाबीचा विचार करून माहिती अधिकार कार्यकर्ते, ज्येष्ठ विधिज्ञ किशनचंद जैन यांनी २०२१ साली सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. त्यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होऊन न्या. डी. वाय. चंद्रचूड, न्या. पी. एस. नरसिम्हा, न्या. जे. बी. पार्डीवाला यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठाने १७



ऑगस्ट २०२३ रोजी निर्णय दिला. त्यात आरटीआय ॲक्ट २००५ कलम ४ (१) (ख) च्या प्रभावी अंमल अंमलबजावण आदेशित केले. प्राधिकरणांनी अद्ययावत माहिती वेबसाइटवर अपलोड केली की नाही, याचे मॉनिटरिंग केंद्रीय माहिती आयोग व राज्य माहिती आयोग करेल. तसेच डीओपीटीचे थर्ड पार्टी ऑडिट होईल, असे या आदेशात नमूद आहे. या १७ बाबी कराव्या लागतील उघड कार्यालयाची रचना, कार्य आणि कर्तव्ये कार्यालयाचे अधिकार, कर्मचायांचे अधिकार व कर्तव्ये निर्णयाची कार्यपद्धती, पर्यवेक्षण व उत्तरदायित्व प्रणाली,कार्यालयाची मानके करताना लोकांशी, - नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका, अभिलेख नियंत्रणातील दस्तऐवजांच्या - प्रवर्गाचे विवरण अंमलबजावणी विचारविनिमयासाठी असलेली गठीत केलेल्या मंडळाचे विवरण व त्यांच्या बैठकीचे कार्यवृत्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची निर्देशिका व्यवस्था सल्ला देण्यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन, तसेच नुकसानभरपाईची पद्धती योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च, अभिकरणाचा अर्थसंकल्प संवितरित रकमा,अर्थसहाय्याची पद्धती, वाटप केलेल्या रकमा, लाभार्थी तपशील, ज्यांना सवलती, परवाने, प्राधिकारपत्रे दिली, त्यांचा तपशील वाचनालयाच्या वेळा जनमाहिती अधिकाऱ्यांची नावे, पदनाम कार्यालयाची इतर विहित माहिती, प्रकाशने, इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध माहितीचा तपशील माहिती - मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध सुविधा उपलब्ध असतील.


महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ नांदेड,
ता.जि. नांदेड र. नं. F-47 नांदेड (महाराष्ट्र) द्वारा संचालित

**सिद्धार्थ प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनु आदिवासी आश्रम शाळा, चौका, ता. जि. औरंगाबाद**

**पाहिजेत**

अनुमाशा- २०२३/प्र.क्र. का. 2 (ब) /4474/ २०२३ /दिनांक 11/०८/ २०२३. अप्पर आयुक्त अमरावतीचे पत्रानुसार (१०० टक्के अनुदानित ) खालील पदे त्वरित भरणे आहे.

| अनु. क्र | सहा. शिक्षक | पद संख्या | शै. पात्रता | वेतन श्रेणी | संवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सहा. शिक्षक (माध्यमिक) (शिक्षणसेवक) | 1 | बीए.बी.एड. पात्र MS. CIT | शासकीय नियमानुसार | खुला |
| 2 | स्त्री अधिक्षिका | 1 | 1) B.S.W./M.S.W. 2) MS. CIT नर्सिंग असल्यास प्राधान्य | शासकीय नियमानुसार | खुला |

टीप : इच्छुक उमेदवाराने मूळ कागदपत्रांसह स्वखर्चाने सिद्धार्थ प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनु. आदिवासी आश्रम शाळा चौका, ता. जि. औरंगाबाद येथे दिनांक 03/10/2023 रोजी सकाळी 10.30 ते 2.00 पर्यंत प्रत्येक्ष हजर राहावे.

स्वाक्षरित

अध्यक्ष /सचिव
महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ नांदेड




# बैलपोळ्यावर यंदा दुष्काळाचे गडद ढग

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** पोळ्याला पावसाची दिशा बदलते. त्यामुळेच 'पोळा अन् पाऊस झाला भोळा' असे म्हटले जाते. दुष्काळ समजण्याचाही 'दुष्काळ'! पोळ्याला पावसाची दिशा बदलते. त्यामुळेच 'पोळा अन् पाऊस झाला भोळा' असे म्हटले जाते. तथापि पाऊसच गायब झाल्याने त्याची दिशा बदलण्याचा प्रश्नच नाही. परिणामी कृषी संस्कृतीतला महत्त्वाचा सण असलेल्या पोळ्यावर दुष्काळाचे ढग आहेत. पोळा हा कृषी संस्कृतीतला महत्त्वाचा सण. या दिवशी बलांची पूजा केली जाते. वर्षभर ज्यांच्या मानेवर जू आहे, त्यांचे खांदे मळले जातात. स्वच्छ धुवून आंघोळ घातली जाते. साजही चढवला जातो. यंदा मात्र पोळ्याच्या सणावर दुष्काळाची छाया आहे. त्यामुळे ग्रामीण भागात पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर सध्या कोणतेच समाधान दिसत नाही. श्रावणातील हा शेवटचा दिवस असल्याने श्रावणातल्या रंगरूपाची उधळण नेहमीच पोळ्याच्या पाश्वभूमीवर जाणवते. या वेळी मात्र दुष्काळाचे सावट पोळ्यावर आहे. परिणामी पोळ्याचा बाजार करण्यासाठीही शेतकऱ्यांना अनेक अडचणी सहन कराव्या लागल्या. पाऊसच नसल्याने यंदाचा पोळा कोरडाच जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

पावसाने ताण दिल्यास किमान पोळ्याच्या दिवशी तरी पाऊस येतो, अशी श्रद्धा ग्रामीण भागात आहे. बलांची पाठ भिजवण्यासाठी का होईना पण पावसाची हजेरी होतेच, असे खेडया-पाडयात मानले जाते. त्यामुळे उद्या शेतकऱ्यांना पुन्हा पावसाची प्रतीक्षा आहे. चालू आठवडयाच्या सुरुवातीला पावसाने सलग दोन दिवस हजेरी लावली. जिल्हाभरात पाऊसही झाला. काही ठिकाणी पाणी वाहताना दिसले. पोळ्याच्या दिवशी बलांना धुण्यासाठी तरी पाणी मिळते की नाही, अशी परिस्थिती होती. मात्र, आठवडयात सलग दोन दिवस झालेल्या पावसाने काही भागात ही चिंता दूर केली. यंदा पहिल्यांदाच पावसाचे पाणी वाहताना दिसले. काही



**सजावटीच्या वस्तूंचे दर :** पितळी घुंगरू – 750 रुपये किलो, मोठी घंटा (घाटी) – 600 रुपये किलो तोडा (पितळी साखळी) – 700 रुपये किलो, घुंगराचा पट्टा – 1500 रुपये जोड, कवर 20 रुपये तोळा

'वर्षभर ज्यांच्या भरवशावर शेती कसून शेतकरी उत्पन्न घेत असतो, त्यांच्यासाठी वर्षातील एक दिवस महागाई वाढली असली तरी सण साजरा करणे महत्त्वाचे आहे . खर्चात थोडी कपात करून दरवर्षीप्रमाणे यंदाही सण मोठ्या प्रमाणात खरेदि करुन साजरा करणार आहोत .

**सुनिल सोनवणे ,शेतकरी**

ठिकाणी पाणी साचल्याच्या खाणाखुणाही दिसत आहेत. त्यामुळे बल धुण्यासाठी काही गावात पाणी उपलब्ध झाले वॉशिंग सेंटर वर बैल पुण्याची वेळ आली, असुन अनेक ठिकाणी पाण्याचे दुभक्ष्य मोठया प्रमाणावर आहे. श्रावण महिना संपता संपता जे सणवार सुरू होतात ते पुढे दसरा-दिवाळीपर्यंत चालू असतात. खरीप हंगामात तीन महिन्यांच्या आत येणाऱ्या मूग, उडीद, सोयाबीनसारख्या पिकांवर शेतकऱ्यांची भिस्त असते. ताणलेला हात मोकळा होण्यासाठी ही पिके हातभार लावतात. त्यामुळे पोळा, महालक्ष्मीसारख्या सणांच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या हाती या पिकांचा पसा येतो. यंदा खरीप हंगामाचीच वाट लागल्याने आता सणवार कोणत्या भरवशावर करायचे, असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आहे. कोणतेही पीक घरात आले नसताना शेतकरी यंदा पोळ्याच्या सणाला सामोरे जात आहेत. ग्रामीण भागात पूर्णपणे दुष्काळी वातावरण असल्याने पोळा या सणाची रयाच निघून गेली आहे. पोळ्याच्या पाश्वभूमीवर पाऊस आपली दिशा बदलतो. याच दिवसांत पावसाची अनिश्चितताही मोठया प्रमाणात असते. श्रावणातल्या ऊन-सावलीच्या लपंडावाप्रमाणे या दिवसांतला पाऊसही बेभरवशाचा असतो. तो बलाच्या एका शिंगावर पडला, तर दुसऱ्या शिंगावर कदाचित पडणारही नाही, एवढी अनिश्चितता या पावसाची असल्याचे जुने संकेत बोलले जातात. या वेळी पावसाने मोठा ताण दिल्याने पोळा सण कसा साजरा करायचा, या विवंचनेत शेतकरी आहे. पाऊसच गायब झाल्याने कुठेही गवत उगवलेले दिसत नाही. परिणामी साठवून ठेवलेला चारा आताच बलांसाठी वापरला जात आहे. पावसाळ्यात गवत खायला मिळते. त्यामुळे बलांसाठी कडबा तसाच राखून ठेवला जातो, पण आता शिवारात गवतच नसल्याने कडब्यावरच बलांची गुजराण होत आहे. एकीकडे पाऊस नसल्याने आटलेले जलसाठे, दुसरीकडे बांधावर न उगवलेले गवत, खरिपातल्या नगदी पिकांनी केलेली निराशा आणि पावसाने दिलेला दगा या पाश्वभूमीवर यंदाचा पोळा हा सण शेतकरी जडावलेल्या अंतकरणानेच साजरा करतील, अशी परिस्थिती आहे.

**मातीच्या बैलांनाही विशेष मागणी**

पूर्वी ग्रामीण भागात प्रत्येक शेतकऱ्याकडे जनावरे असायची. मात्र, शेतीकामात आधुनिक साहित्यांचा वापर वाढल्याने जनावरांची संख्या झपाट्याने कमी झाली. सध्या अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे बैलजोडी पाहावयास मिळते. शेती मशागत अन् बैलजोडी हे पारंपरिक समीकरण असल्यामुळे बैलजोडी नसलेले शेतकरी पोळ्याच्या दिवशी मातीच्या बैलांची पूजा करून हा सण साजरा करतात.

# मराठा आरक्षण मागणीसाठी शिवणी जामगा येथे विठ्ठल जामगे यांचे आमरण उपोषण!

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** महाराष्ट्रातील तमाम मराठी समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावे, जालना जिल्ह्यातील आतरवाली सराठी या गावी मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी व तमाम मराठा समाजाला कुणबी मराठा प्रमाण पत्र देऊन सरसगट ओबीसी मध्ये आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्या वतीने आज सकाळी ९ वाजता सदरील उपोषणास आरंभ करण्यात येणार आहे. जोपर्यंत महाराष्ट्र राज्यातील व केद्रीय सरकार मराठी समाजाला आरक्षण लागू करणार नाही तोपर्यंत माझे हे अमरण उपोषण सोडणार नाही अशी प्रतिक्रिया उपोषण कर्ते विठ्ठल सुभाष जामगे यांनी सदरील पत्रकार यांच्याशी बोलताना सांगितले.



# ग्राहक आयोगातील नियुक्त्या रखडल्या

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** ग्राहक आयोगाच्या अध्यक्ष आणि सदस्यांच्या नियुक्त्या तीन महिन्यांत व्हाव्या, असा निर्णय ३ मार्च २०२३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. परंतु अद्यापही नियुक्ती नसल्याने आयोगाच्या कामासाठी देखरेख समिती स्थापन करण्याची आग्रही मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्रकडून करण्यात आली आहे. ग्राहक पंचायत महाराष्ट्र विदर्भ प्रांत अध्यक्ष श्यामकांत पात्रीकर म्हणाले, ग्राहक आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांच्या जवळपास शंभर जागा रिक्त असून त्या भरण्यासाठी जाहिरात निघाली. त्यात विविध विषयातील तज्ज्ञांनी अर्ज करावेत, असे नमूद होते. त्यानुसार सुमारे १ हजार ५०० अर्ज आलेत. या सर्वांची जूनमध्ये लेखी परीक्षा झाली. त्यापैकी २३० जणांची ऑगस्टमध्ये तोंडी परीक्षाही आटोपली. परंतु, अद्याप नियुक्त्या झाल्या नाही.

# भोकरला मराठा आरक्षणसाठी रास्ता रोको आंदोलन; वाहतूक विस्कळीत

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** म्हैसा रस्त्यावरील सोनारी लगत बूधवारी (ता.१३) सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी रास्तारोको आंदोलन करण्यात आले. यावेळी काही काळ वाहतूक विस्कळित झाली होती. मागील चाळीस वर्षांपासून वर्षापासून मराठा समाज आरक्षणासाठी लढा देत आहे. अनेक पक्षानी सत्तास्थानी प्रतिनिधित्व केले. अद्दाप मराठा आरक्षणाचा प्रश्न कोणीही मार्गी लावू शकला नाही.सध्या केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाची सत्ता असल्यामुळे कायदेशीर टिकणारा आरक्षण देण्यासाठी राज्य शासनाला केंद्राची आवश्यकता भासल्यास काही दिवसात केंद्राचं होत असलेल्या विशेष अधिवेशनात आरक्षणाची केंद्राकडून मदत घ्यावी. आरक्षणाचा प्रश्न मार्गी न लागल्यास येणाऱ्या काळात केंद्रातील व राज्यातील सत्ताधाऱ्यांचा सकल मराठा समाज तीव्र निषेध करेल असे निवेदनात नमूद केले आहे. अंदोलनात शंकर पाटील बोरगावकर, शिवा माने, जितेंद्र सावंत यांनी आपले मत मांडले. रास्ता रोकोत अक्षय शिंदे, दशरथ पाटील कदम, बाबुराव बालाजी कराळे, संदीप येलुरे, अनिल जाधव, राजकुमार शिंदे, नारायण गडमवार, सुनील पाटील पवार, श्याम पाटील सोनारीकर, अमोल शिंदे, आनंद पाटील हसापूरकर, भानू प्रसाद शेषराव पाटील यांच्या सह बहूसंख्य कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. आंदोलनामुळे काही तास वाहतूक विस्कळित झाली होती.

तृतीय पुण्यस्मरण



स्व. कौसल्याबाई तात्यासाहेब जोगदंड

आपल्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन

क्षणोक्षणी आमच्या मनी तुमचीच आहे
आठवण, हीच आमच्या जीवनातील
अनमोल अशी साठवण

: शोकाकुल :
बाळासाहेब जोगदंड आणि परिवार
अंबाजोगाई, जि.बीड

# धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करावा

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** गेल्या अनेक पिढ्यापासून भटकंती करणाऱ्या धनगर बांधवाचा आरक्षणाचा प्रश्न तसाच प्रलंबित असून त्यांना अनुसूचित जमातीत समावेश करावा. मागणीची अंमलबजावणी नाही केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यशवंत सेनेचे मराठवाडा प्रमुख नागोराव शेंडगे यांनी बुधवारी (ता. १३) केली आहे. निवेदनात नमूद केले आहे की, धनगर समाजाचे कार्यकर्ते शेखर बंगाळे हे सोलापूर येथे मंत्री विखे पाटील यांना निवेदन देताना त्यांचेवर भंडारा उधळल्याने त्यांना विखे पाटलाच्या समर्थकांनी व अंगरक्षकांनी बेदम मारहाण करण्यात आली या घटनेचा तिव्र निषेध करीत मारहाण करणाऱ्या भाजपचे नरेंद्र काळे व इतरावर ताबडतोब कारवाई करावी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धनगर समाजाला संविधानात अनूसुची क्र.३६ नूसार अनुसूचित जामातीचा दर्जा दिला त्याची अंमलबजावणी राज्यकर्त्याकडून होत नाही ती प्रस्थापित सत्ताधारी राजकारणी यांनी आमच्या आरक्षणाचा प्रश्न जाणून बुजून सोडविला नाही तीर्थक्षेत्र चौढी जिल्हा अहिल्यानगर येथे सुरू असलेल्या समाज बांधवांच्या उपोषणाला जाहीर पाठिंबा आहे. आरक्षणाची अंमलबजावणी नाही झाल्यास सकल धनगर समाजाच्या वतीने महाराष्ट्रात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या निवेदनावर सुभाष नाईक यशवंत सेना मराठवाडा संघटक, मारोतराव भोंबे सरपंच पिंपळढव, खंडोजी गोरे, राजेश हाके, निलेश चिकळकर, खंडेराव शेंडगे, निलेश सुरवंशी, सुशिल शिंदे, कृष्ण कवळसे, गोविंद लिंबेकर, सतिष मने, साहेबराव कोकणे सतिश माने यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# जळगाव जामोदच्या तहसीलदारांचा अनागोंदी कारभार

## जनता उपाशी महसूल तुपाशी : विजय पोहनकार यांनी तहसीलदारांच्या कार्यक्षमतेवरच ठेवले बोट

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** २२ जूलैचा महापूर उलटून बराच कालावधी लोटला पण त्याच्या पाऊलखुणा आजही जनलोकात ताज्या आहेत. त्या महापुराची लोकांच्या मनात अजूनही धडकी भरली आहे. पुरामुळे प्रंचड प्रमाणात जळगाव तालुक्यातील शेतीचे आणि नदिनाल्याच्या काठावरील लोकांचे नुकसान झाले आहोत.गाधात सर्वे झाले मोठमोठ्या बैठका झाल्या पण अनेक गावातील पूरग्रस्थ लोक आजही मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. खरेतर या सर्व बाबींवर देखरेख, नियंत्रण असते ते महसूल प्रशासनाचे. पूर ओसरल्या नंतर २४ तासाच्या आत मिळणार अनुदान दीड महिना उलटून गेला पण अजूनही अनेक. कुटुंबांना त्याचा मोबदला मिळाला नाही. यासह बऱ्याच महत्वाच्या प्रश्नांना हात घालत त्याबाबतचे निवेदन जळगाव जामोद तालुक्यातील जेष्ट पत्रकार विजय पोहनकार यांनी १२ सप्टेंबर रोजी उपविभागीय अधिकारी जळगाव जामोद यांना दिले.

निवेदनात त्यांनी थेट तहसीलदार यांचेवरच अकार्यक्षमतेचा ठपका ठेवत त्यांच्या चौकशीची मागणी केली आहे. प्रशासन हाताळतांना त्या पुर्णतः अपयशी ठरव्या आहेत. त्यामुळे गावागावत त्याच्या अकार्यक्षमतेच्या कार्याची बरीच चर्चा होत असून जनसामान्यांमध्ये तहसीलदारा विरोधात संताप व्यक्त केल्या जात आहे. त्याचाच परिणाम म्हणून आसलगाव येथील संतोष सोनोने या पुरग्रस्थ व्यक्तीने ११ सप्टेंबर रोजी माणेगाव येथील पूर्णा नदीच्या पुलावरून उडी घेत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.एवढेच नाही तर तहसीलदार शितल होलाट यांनी तालुक्यातील खेरडा खुर्द येथील सुगदेव बापट याला मरत दाखवून त्याला अनेक योजनापासून वंचित ठेवले आहे. त्यामुळे सुगदेव बापट यांनी १५ आगष्ट रोजी आत्मदहनाचा इशारा प्रशासनाला एका निवेदनाद्वारे दिला होता. याहीपलीकडे जावून तहसील कार्यालयातून निवृत्त झालेले काशीनाथ जगन्नाथ भेलके हे राजरोजपणे तहसील कार्यालयात बसून जनुकाही आपणच प्रशासन चालवत आहोत अशा अर्विभावात वागतात. त्या व्यक्तीला कोणाच्या आशीर्वादाने बसायला खुर्ची भेटते. काशीनाथ भेलके यांचा तहसिल कार्यालयांशी कुठलाच संबंध नसतात ते मात्र स्वतः ला महसूल



प्रशासनातील व्यक्ती समजतात. याची सुद्धा चौकशी होणे गरजेचे आहे. गेल्या दोन वर्षापासून आडोळ या गावी कोतवाल नसून त्या कोतवाल बाईचा पगार मात्र तहसिल कार्यालय नियमितपणे काढते.तीऐ बाई कोठे काम करते, याचा गावकऱ्यांकडून अहवाल घेवून तहसीलदार यांना याबाबतीत चौकशी करून त्याची उत्तरे विचारावीत.

१ ऑक्टोबरपर्यंत यावर कार्यवाही न झाल्यास २ ऑँक्टोबर गांधी जयंती आपल्या कार्यालयासमोर विधायक मार्गाने आंदोलन करण्यात येईल. दरम्यान माझ्या जीवीतास काही धोका निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित विभागावर राहिल असा इशारा सुद्धा विजय पोहनकार यांनी प्रशासनाला दिला आहे.एवढ्या मोठ्या प्रमाणावर जणता त्रस्त असतांना महसुल प्रशासन सुस्त असेल तर नक्कीच कुठतरी पाणी मुरत असून आजरोजी "जनता उपाशी ,महसूल प्रशासन तुपाशी" अशी खमंग चर्चेला तालुक्यात उधाण आले आहे.



# फर्दापुरात आयुष्यमान भव मोहिमेचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**फर्दापूर :** बुधवार रोजी आरोग्यवर्धिनी उपकेंद्र फर्दापूर, प्राथमिक आरोग्य केंद्र जरंडी अंतर्गत "आयुष्मान भव मोहीमेचा" उद्घाटन गावातील प्रतिष्ठित व्यक्ती यांच्या हस्ते करण्यात आला, त्यानंतर आभा कार्ड चे वितरण माननीय सरपंच महोदय यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

आयुष्यमान भव या पंधरवडा कार्यक्रमांमध्ये देण्यात येणाऱ्या सेवांबद्दल तसेच आरोग्य संबंधित सेवांची माहिती गावकऱ्यांना देण्यात आली, आयुष्मान भारत गोल्डन कार्ड व आभा कार्डचा महत्व सांगण्यात आला तसेच एनसीडी कॅम्प घेण्यात आला. त्यामध्ये एकूण 70 रुग्णांची बीपी, शुगर, CBC, THYROID तपासणी करण्यात आली. त्यावेळी समुदाय आरोग्य अधिकार डॉ. प्रियदर्शनी पवार, आरोग्य सेवक श्री अमोल धमके, प्रयोगशाळा तंत्रज्ञ सागर घायवट, तसेच सर्व आशा सेविका उपस्थित होत्या.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पुण्यात होणार समन्वय बैठक

आधुनिक केसरी न्यूज

पुणे : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अखिल भारतीय समन्वय बैठक २०२३ पुणे येथे होत असून या बैठकीत ३६ संघटनांचे २६६ प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. पर्यावरणपूरक जीवनशैली, जीवनमूल्यांवर आधारित कुटुंबव्यवस्था, समरसतेचा आग्रह, स्वदेशी आचरण आणि नागरी कर्तव्यांचे पालन या पाच मुद्द्यांवर बैठकीत चर्चा होणार असल्याची माहिती रा. स्व. संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनीलजी आंबेकर यांनी बुधवारी दिली.

रा. स्व. संघ समन्वय समितीच्या दि. १४, १५, १६ सप्टेंबर २०२३ दरम्यान होणाऱ्या बैठकीची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत श्री. आंबेकर बोलत होते. संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव यावेळी उपस्थित होते.

श्री. आंबेकर म्हणाले की, संघाचे स्वयंसेवक आपल्या शाखा कार्याच्या माध्यमातून देशसेवेचे कार्य अविरत करत असतात. दैनंदिन शाखेच्या कामाबरोबरच समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात संघाचे कार्यकर्ते विविध सामाजिक कामांमध्ये मग्न असतात. ही सर्व कामे समाजसेवा आणि राष्ट्र उभारणीसाठी सुरू आहेत. बैठकीत सहभागी होणाऱ्या सर्व संघटना संघप्रेरित असून सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रात त्या स्वायत्तरितीने कार्य करतात. या संघटनांची बैठक वर्षातून एकदा आयोजित केली जाते. या बैठकीत या संघटना त्यांचे कार्य व त्यातील



अनुभवांची परस्परांमध्ये देवाणघेवाण करतात. या निमित्ताने एकमेकांकडून शिकण्याची आणि एकमेकांना समजून घेण्याची संधी मिळते. या सर्व संघटनांचे उद्दिष्ट आणि लक्ष्य समान आहे. अनेक संघटना विषयानुरूप आणि आवश्यकतेनुसार एकत्र येऊन कार्य करतात. उदा. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत शिक्षण क्षेत्रातील विविध संघटना एकत्र येऊन काम करत आहेत. अशाप्रकारच्या सामूहिक कामावरही बैठकीमध्ये चर्चा होते, अशी माहिती श्री. आंबेकर यांनी दिली.

जवळपास जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संघटनांचे प्रतिनिधी बैठकीत सहभागी होणार आहेत. या साऱ्या संघटना अनेक वर्षांपासून समाजजीवनात सक्रिय असून त्यांनी आपल्या परिश्रमाने आपापल्या क्षेत्रात महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे. या संघटना आपापल्या कार्यक्षेत्रातील त्यांचे अनुभव बैठकीत मांडतील. तसेच राष्ट्रीय आणि वर्तमान परिस्थितीच्या संदर्भातील अनुभव देखील सांगितले जातील. त्यासंबंधित अनेक विषयांवर बैठकीत मूलभूत चिंतन होईल आणि त्या-त्या संघटनांची आपापल्या क्षेत्रातील आगामी कार्याची दिशा काय राहील याचीही योजना बैठकीत मांडली जाईल, असेही श्री. आंबेकर म्हणाले.

पूजनीय सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, सरकार्यवाह श्री. दत्तात्रेयजी होसबाळे, तसेच डॉ. कृष्णगोपालजी, डॉ. मनमोहनजी वैद्य, श्री. अरुण कुमारजी, श्री. मुकुंदाजी आणि श्री. रामदत्तजी चक्रधर हे सर्व सहसरकार्यवाह आणि प्रमुख पदाधिकारी या बैठकीत उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत विद्या भारती, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सक्षम, वनवासी कल्याण आश्रम, सेवा भारती, विश्व हिंदू परिषद, राष्ट्र सेविका समिती, भारतीय जनता पार्टी, भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ आणि अन्य सहयोगी संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

# शहरवासीयांची वाढीव पाणीपट्टी विरोधात आयुक्तांसोबत बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** वाघाळा महापालिकेने जनतेला विश्वासात न घेता अचानक पाणीपट्टीचे दर ४३% ने वाढविल्यामुळे शहरवासीय संतापले आहेत. भाकप पदाधिकारी, नागरी कृती समिती व शहरातील अनेक संघटनांनी मनपा प्रशासनाला वाढीव पाणीपट्टी रद्द करण्यास्तव दोन महिन्यांपूर्वी पूर्व सूचना देऊन आमरण उपोषण व तीव्र आंदोलनाचा इशारा दिला होता. याची दखल घेऊन मनपा पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सोनसळे यांच्या उपस्थितीत पक्ष पदाधिकाऱ्यांसह शहरातील संघटना व नागरिकांसोबत दिनांक ९/८२०२३ रोजी बैठक पार पडली. कार्यकारी अभियंत्या सोबत झालेल्या बैठकीत समाधानकारक तोडगा नाही निघाला म्हणून परत विविध पक्ष संघटनांनी पुन्हा निवेदन देऊन दिनांक ११/९/२०२३ रोजी मनपा आयुक्तांसोबत बैठकीची दुसरी फेरी पूर्ण झाली. नांदेड शहरवासीयांना दररोज स्वच्छ पाणीपुरवठा करण्यास मागच्या २५ वर्षांपासून मनपा कशी अकार्यक्षम व असमर्थ आहे हे सर्व निवेदनकर्त्यांनी आयुक्तांसोबतच्या बैठकीत पटवून सांगितले. शहर विकासाप्रति नागरिकांची भूमिका नेहेमीच प्रशासनाला सहकार्याची असते, पण मनपा प्रशासनाकडून मागच्या २५ वर्षांपासून शहरवासीयांना पिण्यायोग्य पाणी मिळत नाही उलट



जाचक दरवाढ करून नागरिकांना वेठीस धरण्याचे काम मनपा करत आहे हे चर्चेतून स्पष्ट दाखवून दिले. शहरवासीयांनी दिलेल्या निवेदनातील दहा मागण्यांबाबत मनपा प्रशासनाने महिना अखेर पर्यंत वेळ मागितला आहे. सप्टेंबर ३० पर्यंत पाणीपट्टी दर वाढी बाबत पुढील बैठक ठेवण्याची विनंती केल्यावरून नागरिकांनी तूर्तास आंदोलन स्थगित केले आहे. जर वाढीव दरवाढ रद्द केली नाही तर येणाऱ्या गांधी जयंती पूर्वी शहरवासीय व सर्व संघर्षप्रेमी नागरिक मनपा प्रशासनासमोर आमरण उपोषणास बसणार असा इशारा देऊन बैठक आटोपती घेतली. बैठकीत मनपा पापु विभागाने ३५०० अनधिकृत नळ जोडण्या अधिकृत करून २,५०,००,००० रुपयांची महसुली उत्पन्नात वाढ केल्याबद्दल शहरवासीयांतर्फे प्रशासनाचा पुष्पगुच्छ व पुस्तक भेट देऊन स्वागत करण्यात आले. भविष्यात असे प्रामाणिक प्रयत्न सतत चालू ठेवण्याची अपेक्षा नागरिकांतर्फे व्यक्त करण्यात आली. बैठकीस मनपा तर्फे आयुक्त डॉ. माहेशकुमार डोईफोडे, अति. आयुक्त गिरीश कदम, पापु चे कार्यकारी अभियंता सोनसळे, उपअभियंता कांबळे उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक कॉम्रेड विजय गाभने, समारोप उप प्राचार्य लक्ष्मण शिंदे यांनी केले.

मागण्या बाबत कॉम्रेड के के जांबकर यांनी विस्ताराने चर्चा केली. बैठकीस ऍड. धोंडिबा पवार, बंडोपंत कुंटुरकर, डॉ. पुष्पा कोकीळ, खान मॅडम, सोपानराव मारकवाड, कॉम्रेड दिगंबर घायाळे, कॉम्रेड वैशाली धुळे, विलास शिराढोनकार, रघुनाथ सरदेशपांडे, बालाजी पवार, डॉ. मुकुंद पांडे,प्रा. दूधमल यांच्यासह विविध संघटनांचे पुढारी, वकील, प्राध्यापक, इंजिनीअर, डॉक्टर, साहित्यिक, लेखक वर्गातून अनेक मान्यवर उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# मुंबई-गोवा महामार्गावर जनसुविधा केंद्रे सुरू केली जाणार

## गणेश भक्तांचा प्रवास होणार अधिक सुखमय : सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** मुंबई -गोवा महामार्गावरून एक लेन वाहतुकीसाठी उपलब्ध होत असून गणेशोत्सव कालावधीसाठी महामार्गावर जनसुविधा केंद्र सुरू केली जाणार आहेत, ज्यामुळे प्रवासी व वाहनधारकांना मदत मिळेल व प्रवास चांगला होईल, अशी माहिती राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी दिली. यावेळी ओव्हर टेक टाळून प्रवासात कोंडी न होण्याची काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी आज मुंबई ते गोवा या महामार्गाच्या पनवेल ते इंदापूर या भागातील कामाची पाहणी केली. त्यांच्या हस्ते कशेडी टनेलचे लोकार्पण करण्यात आले. कासू ते इंदापूर या टप्प्यातील कामांची पाहणी केली. पनवेल कासू या पहिल्या ४२ किलोमीटर एक लेन पूर्ण झाली असून पैकीकाही किरकोळ स्पॉट वगळता इतर वाहतुकीसाठी योग्य आहे. दुसरा टप्प्यातील कासू ते इंदापूर मधील कामे वेगाने केली जात आहेत.यामध्ये सीबीटी तंत्राचा वापर करून कामे केली जात आहेत. अवजड वाहनांना वाहतूक बंदीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय महामार्ग वरील कासू पासून पुढील कामाची गती वाढविण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांना आदेश दिले असून तीन ते चार दिवसात राहिलेली कामे पूर्ण केली जातील असे यावेळी मंत्री रविंद्र चव्हाण यांनी बोलताना सांगितले. गणेश भक्तांचा प्रवास अधिक सुखकर व्हावा यासाठी महामार्गावर गणेशोत्सव कालावधी साठी सुविधा केंद्र सुरू केली जात आहे. खारपाडा, खारपाले, वाकण, कोलाड, इंदापूर, माणगाव, लोणेरे, महाड, महाड एम.आय.डी.सी., पोलादपूर या ठिकाणी जनसुविधा केंद्रावर पोलीस मदत केंद्र, वैद्यकिय उपचार सुविधा, बालक आहार कक्ष व मोफत चहा, बिस्कीट, सरबत, पाणी आणि महिलांसाठी फिडींग कक्ष उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.



महामार्गावरील पोलादपूर ते खेड दरम्यान कशेडी घाटातील दोन किलोमीटर बोगद्याचे काम पूर्ण झाले असून त्याचे आज सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यामुळे प्रवासातील इंधन व वेळेत होणार बचत होणार असल्याने याचा फायदा वाहनधारकांना होईल. एकूण १७ किलोमीटर अवघड अंतर या दोन किलोमीटर टनेल मुळे सोपे व कमी झाले आहे.तसेच घाटातील प्रवासाची 45 मिनिटे वाचेल. यावेळी बोगद्याच्या प्रवेश मार्गाच्या बाजूस मंत्री चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पाहाणी दौऱ्यात त्याचे समवेत माजी आमदार धैर्यशील पाटील, एनएचएआयचे मुख्य अभियंता संतोष शेलार, कार्यकारी अभियंता निरज चवरे व विविध विभागांचे अधिकारी यासह बिपीन म्हामुनकर, नीलेश तलवडकर, महेश शिंदे आदी उपस्थित होते.




# आळंद येथे मेंढपाळाचे कर्ज प्रकरणी बँकेच्या दारी आंदोलन

## फाईल मंजुरी व कर्ज वितरणात व्यवस्थापकाची मनमानी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** औरंगाबाद जिल्हयात आळंद तालुका फुलंब्री येथील महाराष्ट्र ग्रामिण बँक या शाखे वसंतराव नाईक महामंडळाच्या वैयक्तीक व्याज परतावा या योजनेच्या फाईल मंजुर करून कर्ज वितरीत करताना येथील बॅक व्यवस्थापक विविध कारणे पुढे करून कर्ज प्रकरणे परत पाठवत असल्याने मेंढपाळानी मेंढ्यासह बँकेसमोर आंदोलन केले. मराठवाडयात सर्वत्र मेंढ्या - शेळ्या पाळून अनेक वर्षापासून धनगर समाज आपला संसाराचा गाडा व्यवस्थीत रित्या चालवत आहे . या धनगर समाजाची मेंढर ही दौलत असते . असे असतांना मेंढपाळ धनगर समाजाला कर्ज प्रकरण मंजुर करतांना आळंद येथील महाराष्ट्र ग्रामिण बॅक व्यवस्थापक नको ती कारणे दाखून वसंतराव नाईक महामंडळ प्रकरणे परत पाठवत कर्ज देणे टाळत असल्याने मेंढपाळ बांधवातर्फे १२ सप्टेंबर रोजी आळंद शाखेवर मेंढ्यासह आंदोलन करण्यात आले. यावेळी योगेश पाराजी खिलारे, कैलास त्रिंबक गायके, जगनशेठ दाढे, रामदास नारायण गायके, कृष्णा गजाबा खिल्लारे, बाबासाहेब मारोती गायके, सुनिल उत्तमराव तायडे, कौतिक पायगव्हाण, संभाजी रत्नाकर भोसले ,अभिषेक तायडे, रामेश्वर चोपडे ,विजय दत्तु चोपडे , अजिनाथ गायके हे उपस्थित होते. या आंदोलनाचे नेतृत्व सरपंच कैलास गायके यांनी केले. लवकरच नियमायोग्य प्रकरणे मंजुर करून कर्ज वितरीत करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले.

# ऑनलाईन लॉटरी जुगार अड्डयावर पोलीस पथकाने टाकली धाड

## १२ जण ताब्यात; २ लाख १७ हजारांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**चारठाणा :** परभणी पोलीस अधीक्षक यांच्या पथकातील जिंतूर येथे कार्यरत परिविक्षाधिन पोलीस उपअधीक्षक प्राची कर्णे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने मंगळवारी (दि. १२) सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास चारठाणा येथील लॉटरी (बिंगो) जुगार अड्डयावर धाड टाकली. या कारवाईत तीन मोटारसायकल, बारा मोबाईल, नगदी ७ हजार ४२० रुपये असा एकूण २ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून १२ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

येथील बसस्थानक परिसरातील एका ईलेट्रानिक दुकानाच्या पाठीमागील पत्राचे शेड मध्ये ऑनलाईन लॉटरी लॉटरी जुगार अड्डयावर या पोलिस पथकाने अचानक धाड टाकली. या धाडीत जुगार अड्डयाचे चालक व मालक बाबा मुस्सा कुरेशी रा.चारठाणा व येथे जुगार खेळणाऱ्या दिलीप नाथा राठोड, भूजंग मोतीराम राठोड, विश्वनाथ गोविंद पवार, कैलास हिरामण चव्हाण, मोहन लक्ष्मण चव्हाण, रामभाऊ नुरा चव्हाण (सर्व रा. सावरगाव तांडा ता. जिंतूर), आकाश नारायण धारूरकर, सय्यद आजम सय्यद तालेब अली, खय्युम जिलानी इनामदार, बाबा मुसा कुरेशी, शेख मजर मैनोद्दीन शेख, असद शेख हुसनोद्दीन (रा. सर्व चारठाणा, ता. जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथील जिंतूर) असे एकूण १२ जणांना ताब्यात घेतले खळबळ माजली आहे.

या अड्डयावरील धाडीतडील अरोपीताच्या विरुद्ध चारठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत तीन मोटारसायकल जुगाराचे साहित्य व रोख रक्कम ७ हजार ४२० असा एकूण २ लाख १७ हजार २० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस अधीक्षक यांच्या पथकातील परिविक्षाधिन पोलीस उपविभागीय अधिकारी प्राची कर्णे, कर्मचारी जगन्नाथ भोसले, दिनेश स्वामी, चारठाणा पोलीस ठाण्याचे बिट जमादार यु.टी. सातपुते, सुधाकर कुटे आदींनी ही कारवाई केली आहे. या कारवाईमुळे खळबळ ऊडाली आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर